महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे - ४११००१

# मार्गदीपिका

## कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५

### भाग १

# लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा

कौटुंबिक हिंसा पीडित महिलेला न्याय मिळवून देताना......




लेखक : मिलिंद चव्हाण,
लिंगभाव प्रशिक्षक
आणि
स्त्री अभ्यास केंद्र,
आयएलएस विधी महाविद्यालय, पुणे

SWISSAID

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे - ४११००१

# मार्गदीपिका

## कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५

भाग १

# लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा

कौटुंबिक हिंसा पीडित महिलेला न्याय मिळवून देताना......




लेखक : मिलिंद चव्हाण,
लिंगभाव प्रशिक्षक
आणि
स्त्री अभ्यास केंद्र,
आयएलएस विधी महाविद्यालय,
पुणे

## ‘कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’

ह्या कायद्याखाली नेमलेल्या

## अधिकारी आणि सेवा पुरविणाऱ्यांसाठी मार्गदीपिकांचे ७ भाग

| | | |
|---|---|---|
| भाग १ | लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा | - मिलिंद चव्हाण |
| भाग २ | न्यायदंडाधिकाऱ्यांची भूमिका | - जया सागडे |
| भाग ३ | संरक्षण अधिकाऱ्यांची भूमिका | - प्रसन्ना इनवल्ली |
| भाग ४ | वकिलांची भूमिका | - रमा सरोदे |
| भाग ५ | वैद्यकीय सेवा देणाऱ्यांची भूमिका | - संगीता रेगे<br>- पद्मा देवस्थळी<br>- सुजाता आयार्कर |
| भाग ६ | पोलिसांची भूमिका | - मेधा देव<br>- तृप्ती पांचाल |
| भाग ७ | सेवादायी संस्थांची भूमिका | - प्रसन्ना इनवल्ली |

© स्वीसएड, सर्व लेखक; आय्एल्एस् विधी महाविद्यालय आणि महिला व बाल विकास बिभाग, महाराष्ट्र राज्य.

प्रकाशक : मा. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१

२३.१२.२०१९

# संदेश

कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ हा दिवाणी स्वरुपाचा महत्वाचा कायदा आहे. हया कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी अनेक घटकांवर जबाबदारी टाकलेली आहे. त्यातील न्यायाधिश आणि न्याययंत्रणा हा एक महत्वाचा घटक आहे.

कौटूंबिक हिंसेची समस्या गंभीर, गुंतागुंतीची आहे. पुरुषप्रधान आणि पितृसत्ताक समाजरचनेत, लिंगभावाधीष्ठीत होणारी हिंसा (शारीरिक, मानसिक, लैंगिक, आर्थिक, शाब्दिक) स्त्री–पुरुषामध्ये भेदभाव निर्माण करते. ही हिंसा स्त्रीच्या मानवी हक्कांचे आणि राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करते. हया पार्श्वभूमीवर कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाच्या कायद्याखालील येणाऱ्या प्रकरणांमध्ये न्यायालयांचा दृष्टीकोन अधिक संवेदनशिल असणे अपेक्षित आहे असे माननिय सर्वोच्च न्यायालयाने *कृष्णा भटाचारजी वि. सारथी चौधरी* (क्रिमिनल अपिल नंबर.१५४५/२०१५ निर्णय दिनांक २० नोव्हेंबर, २०१५) या न्यायनिर्णयात नमूद केलेले आहे.

कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ हा कायदा स्त्रियांच्या हितासाठी केलेला आहे. त्यामुळे कायद्यातील तरतुदीचा अन्वयार्थ लावताना एकापेक्षा जास्त अर्थ निघत असतील तर कायद्यांच्या उद्दिष्टाला पूरक असा अर्थ निवडला पाहिजे. स्त्रियांना तो त्यांना जास्तीत जास्त न्याय्य कसा ठरेल हयाचा विचार व्हायला हवा.

आयएलस विधी महाविद्यालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राने पुढाकार घेउन दंडाधिकाऱ्यांच्यासह संरक्षण अधिकारी, पोलीस, वैद्यकीय अधिकारी, सेवा देणाऱ्या संस्था आणि वकील हयांच्यासाठी तयार केलेल्या मार्गदीपिकांचे मी स्वागत करतो. या सर्व मार्गदीपिका कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ मधील तरतुदींबाबत सर्वसमावेशक आहेत. विशेष म्हणजे 'लिंगभाव आणि कौटूंबिक हिंसा' ह्याविषयावरील स्वतंत्र मार्गदीपिका सर्व संबधित घटकांना उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो.

सर्व हितसंबधाना माझ्या शुभेच्छा !

१६ ऑक्टोबर २०१८

(न्यायमुर्ती नरेश ह. पाटील)

// ऋणनिर्देश

"पीडब्ल्यूडीव्हीए कादयाखालील सर्व हितसंबंधियांसाठी मार्गदीपिका तयार करणे" ह्या प्रकल्पाला दिलेल्या अर्थसाहाय्यासाठी आणि संकल्पनात्मक रचनेसाठी आम्ही 'स्विसएड इंडियाचे' ऋणी आहोत.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश माननीय न्यायमूर्ती श्री. नरेश पाटील ह्यांनी दिलेल्या संदेशाबद्दल आम्ही त्यांचे विशेष ऋणी आहोत.

अनेक सहकार्यांच्या सहभागामुळेच हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला. या सर्वांचेही आम्ही ऋणी आहोत. त्यांचा नामनिर्देश पुढीलप्रमाणे:

**लेखक**

- मार्गदीपिका - वकिलांची भूमिका - रमा सरोदे, आणि त्यांचे सहकारी असीम सरोदे 'सहयोग', पुणे, आणि इतर वकील
- मार्गदीपिका - वैद्यकीय सुविधा देणाऱ्यांची भूमिका - संगीता रेगे, पद्मा देवस्थळी, आरथी चंद्रशेखर, सुजाता आयार्कर - सेहत (CEHAT), मुंबई, आणि 'दिलासा' केंद्राचे सहकार - चित्रा जोशी, मृदुला सावंत, संजना चिक्लेकर
- मार्गदीपिका - पोलिसांची भूमिका - मेधा देव, तृप्ती पांचाल - टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या, RCI-VAW आणि या विभागातील सहकारी - नंदकिशोर डहाळे, शीतल देवस्थळी, सुनिता पवार - मुंबई
- मार्गदीपिका - लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा - मिलिंद चव्हाण, लिंगभाव प्रशिक्षक, पुणे
- संरक्षण अधिकाऱ्यांची भूमिका लिहिताना प्रसन्ना इनवल्ली यांना महाराष्ट्र महिला-बाल विकास आयुक्तालय, आणि शहरी व ग्रामीण भागातील काही संरक्षण अधिकाऱ्यानी दिलेल्या माहितीबद्दल तसेच मार्गदीपिकेच्या कच्च्या मसुद्यावर प्रतिक्रया दिल्या बाबत आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**अनुवाद साहाय्य**

सुषमा देशपांडे

**इतर साहाय्य**

आय्एल्एस् विधी महाविद्यालयचे - अशोक माळवदे, योगेश सोनावणे, शुभांगी पुराणिक, प्रमोद राणे, हरिभाऊ दोडके, चंद्रकांत घुमे, वेंकट घतकार

**छपाई**

जलाराम कॉपियर्स, पुणे

**सर्वांना पुनः एकदा मनापासून धन्यवाद!**

## दोन शब्द ...

### सुरवात करताना ...

स्त्रियांवर होणारी कौटुंबिक हिंसा हा भारतातीलच नव्हे तर जगातील एक गंभीर सामाजिक प्रश्न आहे. कौटुंबिक हिंसेचे गंभीर आणि दूरगामी परिणाम केवळ स्त्रियांच्या आयुष्यावरच नाही तर कुटुंब आणि समाजावर होत असतात. २००५ पर्यंत कौटुंबिक हिंसेचे प्रश्न हे फौजदारी कायद्यातून हाताळले गेले होते. मात्र त्यातून पीडित स्त्रीची कुटुंबात राहून हिंसा थांबावी ही इच्छा पुरी होत नव्हती. उलट हिंसा करणाऱ्या सासरच्या लोकांना तुरुंगवासाची शिक्षा होत होती. त्यामुळे, ती कुटुंबापासून तुटत होती. या पार्श्वभूमीवर देश भरातील महिला संघटनांनी/ सामाजिक संघटनांनी एकत्रित आवाज उठवून कौटुंबिक हिंसेसंदर्भात दिवाणी स्वरूपाचा कायदा हवा, अशी मागणी केली. लॉयर्स कलेक्टिवने पुढाकार घेऊन ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण कायद्याचे’ प्रारूप तयार केले. देशातील वेगवेगळया भागांमध्ये जाऊन संघटनांबरोबर चर्चा करून या प्रारुपात बदल केले गेले आणि ते सरकारला सादर करण्यात आले. संसदेच्या दोन्ही गृहांनी या कायद्याला मान्यता दिली, आणि ‘कौटुंबिक हिंसे पासून महिलांचे संरक्षण अधिनियम’ *(पीडब्ल्यूडीव्हीए* - Protection Of Women from Domestic Violence Act) २००५ मध्ये अस्तित्वात आला. त्यानंतर या कायद्याखालील नियमांची बांधणी झाल्यावर २६/१०/२००६ रोजी या कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली.

या कायद्याची अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्यापैकी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी नेमलेली यंत्रणा. ह्या यंत्रणेचे न्यायाधीश, संरक्षण अधिकारी, वकील, वैद्यकीय सेवा देणारे, सेवादायी संस्था आणि पोलीस हे घटक आहेत.

ह्या सर्व घटकांच्या ह्या कायद्याअंतर्गत असलेल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये स्पष्ट करण्यासाठी स्त्री अभ्यास केंद्राने अनेक प्रशिक्षणे ‘स्विसएड इंडिया’च्या आर्थिक साहायाने आयोजित केली. प्रत्येक प्रशिक्षणात ‘लिंगभाव’ या विषयावर  वर स्वतंत्र दीर्घ सत्र घेण्यात आले. अशी प्रशिक्षणे देशभर अनेक संस्था आयोजित करत होत्या. त्यामुळे अनेकांनी सर्व घटकांना उपयोगी होतील अशी मॅन्युअल्स तयार केली होती. मात्र मराठीत अशा प्रकारचे साहित्य उपलब्ध नव्हते. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक टप्प्यावर कसे काम करायचे, पिडीतेला न्याय मिळण्याच्या दृष्टीने कोणती पाऊले उचलायला पाहिजेत, काय खबदारी घ्यायची, इत्यादी मुद्द्यांच्या संदर्भात साहित्य निर्माण करण्याची गरज होती. स्त्री अभ्यास केंद्राने या कायद्याखालील नेमलेल्या यंत्रणेतील सर्व हितसंबंधीयांसाठी अशा प्रकारचे मराठीत साहित्य तयार करण्याचा दृष्टीने स्विसएड इंडियाच्या आर्थिक साहाय्याने एक प्रकल्प हाती

घेतला. या प्रकल्पाअंतर्गत १. **न्यायाधीश**, २. **संरक्षण अधिकारी**, ३. **वकील**, ४. **वैद्यकीय सेवा देणारे**, ५. **सेवादायी संस्था** आणि ६. **पोलीस** - ह्या प्रत्येक हितसंबंधियांसाठी स्वतंत्र मार्गदीपिका तयार करण्याचे ठरविले.

*पीडब्ल्यूडीव्हीए* कायद्याची बांधणी स्त्रीवादी भूमिकेतून स्त्रियांचे मुलभूत हक्क आणि मानवी हक्क यांची जपणूक आणि संवर्धन व्हावे या पायावर आधारित आहे. कौटुंबिक हिंसा स्त्रियांचा सन्मानाने जगण्याचा अधिकार काढून घेते आणि स्त्री-पुरुषामध्ये भेदभाव करते. या सर्व मुद्द्यांचा विचार करता स्त्रियांवर होणाऱ्या कौटुंबिक हिंसेकडे लिंगभावाच्या दृष्टिकोनातून बघणे फार आवश्यक आहे. अर्थातच त्यासाठी लिंगभाव म्हणजे काय हेही स्पष्ट असायला हवे. म्हणून वरील सहा मार्गदीपिकांबरोबरच **'लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा'** ही स्वतंत्र सातवी मार्गदीपिका तयार करण्याचे ठरविले.

ह्या सातही मार्गदीपिका लिहिण्यासाठी वेगवगळ्या हितसंबंधीयांच्या बरोबर *पीडब्ल्यूडीव्हीए* कायद्याखाली ज्यांनी विशेष काम केले आहे त्यांना लिहिण्याची विनंती करायची असे ठरवले. वकिलांसाठी सहयोग संस्था, पुणे; वैद्यकीय सेवा देणाऱ्यासाठी - सेहत संस्था, मुंबई; पोलिसांसाठी - टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई; यांना विनंती केली. 'लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा या मार्गदीपिकेसाठी' - श्री. मिलिंद चव्हाण, लिंगभाव प्रशिक्षक; यांना विनंती केली. सर्वांनीच मार्गदीपिका लिहिण्याचे तत्परतेने मान्य केले. स्त्रीअभ्यास केंद्राने न्यायाधीश, संरक्षणअधिकारी आणि सेवादायी संस्था यांच्यासाठी मार्गदीपिका लिहिण्याची जबाबदारी घेतली.

ह्या सातही मार्गदीपिका आपल्यासमोर सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. केवळ स्विसएड इंडिया, ह्यांच्या आर्थिक साहाय्यामुळेच हे आम्हाला शक्य झाले.

ह्या मार्गदीपिका **सर्व हितसंबंधियांना आणि प्रशिक्षकांनाही** उपयुक्त ठरतील असा आम्हाला विश्वास वाटतो.

**डॉ जया सागडे** — **प्रसन्ना इनवल्ली**

**मानद संचालिका** — **समन्वयक**

**स्त्री अभ्यास केंद्र,**

**आय्‌एल्‌एस्‌ विधी महाविद्यालय, पुणे**

२० ऑक्टोबर २०१८

# महिला व बाल विकास आयुक्तालय

## महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते
GOVERNMENT OF MAHARASHTRA

२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस शेजारी, पुणे- ४११००१

फोन : ०२०- २६३३००४० Email : commissionerwcd@ymail.com


क्र. : मबाविआ/ ६२०५ दिनांक : २३।१२।२०१८

## "संदेश"

महाराष्ट्र राज्याने महिलांच्या विविध प्रश्नांवर व त्यांच्यासाठी करण्यात आलेल्या उपायावर अनेक योजनांवर प्रगत पाऊले उचलली आहेत.राज्यपातळीवर कौंटुबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ ची अंमलबजावणी महिला व बाल विकास विभागामार्फत सुरु आहे.या कायदयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संरक्षण अधिका-यांच्या नियुक्त्या करणे, त्यांचे प्रशिक्षण,त्यांच्या कार्यालयांना सोयी सुविधा पुरविणे, कायदयाच्या सनियंत्रणासाठी मुल्यांकन पध्दती विकसीत करून सांख्यिकी माहिती जिल्हा व तालुकास्तरावर अदयावत ठेवणे इ.अनेक महत्वाची कामे विभागामार्फत पार पाडली जात आहेत.

PWDVA २००५ कायदयाची अंमलबजावणीची जबाबदारी जरी विभागाची असली तरी या कायदयांतर्गत निश्चित केलेले सर्व स्टेकहोल्डर्स / सहभागी यंत्रणा यांची ही तितकीच महत्वाची जबाबदारी आहे. आय एल एस विधी महाविदयालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राने सर्व सहभागी यंत्रणा / स्टेकहोल्डर्स जसे की, संरक्षण अधिकारी, वकील,पोलीस,वैदयकीय सेवा देणारे,सेवादायी संस्था आणि मा. न्यायदंडाधिकारी यांच्यासाठी तयार केलेल्या मार्गदर्शिका हया अत्यंत उपयुक्त असून त्याचा वापर सर्व स्टेकहोल्डर्सनी स्वतःच्या दैनंदिन कामात करणे आवश्यक आहे.जेणे करून पिडीत महिलेला लवकरात लवकर सर्व सेवा देणे शक्य होईल.

या मार्गदर्शिकेमध्ये दैनंदिन कामातही उदाहरणे देऊन टप्प्या टप्प्याने सर्व स्टेकहोल्डर्सच्या / सहभागी यंत्रणाच्या भूमिका व जबाबदा-या अधिक स्पष्ट करून सांगण्यात आल्या आहेत व त्या प्रत्येकासाठी उपयुक्त आहेत.

याबदल आय एल एस् विधी महाविदयालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राचे विशेष आभार व PWDVA २००५ या कायदयाच्या अंमलबजावणीसाठी काम करणा-या सर्व सहभागी संस्था / यंत्रणा यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा !

(डॉ.हृषीकेश यशोद )
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य,पुणे

मार्गदीपिका

'कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५'

# लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा

## अनुक्रमणिका


१.० प्रस्तावना.....5

२.० भारतातील कौटुंबिक हिंसेच्या कायद्याचा पाया.....6

**भारतीय राज्यघटना**.....6

**आंतरराष्ट्रीय कायदा**.....7

३.० लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा.....8

३.१ हिंसा आणि कौटुंबिक हिंसा म्हणजे काय?.....11

३.१.१ हिंसेची आकडेवारी काय सांगते, ते बघूया:.....12

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ४ (NFHS - 4) नुसार -.....12

हिंसेबाबतची आणखी काही आकडेवारी!.....13

३.१.२ हिंसा फक्त स्त्रियांवरच होते का?.....14

३.१.३ बायको (स्त्री) नवऱ्यावर (पुरुष) हिंसा करत नाही का?.....15

३.१.४ हिंसा कोणावर व कशामुळे होते?.....16

३.२ लिंगभाव म्हणजे काय?.....19

३.२.१ लिंगभाव आणि सत्तासंबंध.....22

३.२.२ काळ बदललेला आहे - लिंगाधारित समानता आली आहे - हे खरं आहे का?.....22

३.२.३ लिंगभावामुळे पुरुषांना व स्त्रियांना होणारे फायदे-तोटे.....23

लिंगभावामुळे पुरुषांना होणारे फायदे-तोटे.....24

लिंगभावामुळे स्त्रियांना होणारे फायदे-तोटे.....25

३.२.४ लिंगभाव व इतर विषमतांची गुंतागुंत ........ 26

३.२.५ पुरुषत्व-मर्दानगीची जडणघडण आणि हिंसा यामध्ये काही परस्परसंबंध आहे का? .. 28

मर्दानगीमुळे होणारे फायदे तोटे ........ 29

३.२.६ मर्दानगी आणि स्त्रियांवरील हिंसा ........ 30

४.० पितृसत्ता (Patriarchy) ........ 31

४.१ आजही पितृसत्ता आहे का? आपल्याला ती कोणकोणत्या रूपात दिसते? ........ 31

४.२ पितृसत्ताक व्यवस्थेची काही वैशिष्ट्ये ........ 32

४.२.१ पुरुषप्रधान समाजव्यवस्था (Male domination) ........ 32

४.२.२ पितृसत्ता उतरंड तयार करते ........ 33

४.२.३ स्त्रियांवर नियंत्रणे ठेवली जातात - ........ 34

मालमत्तेवरील नियंत्रणाचा इतर नियंत्रणाशी कसा संबंध आहे? ........ 39

४.३ पितृसत्तेचे आधारस्तंभ व वाहक (Pillars of patriarchy): ........ 40

५.० स्त्रियांवरील हिंसाचाराबाबत कोणकोणत्या समजुती असतात? ........ 42

५.१ समजूत - "नवऱ्याचे बायकोवर प्रेम असते म्हणून तो तिला मारतो" ! ........ 42

५.२ समजूत - "पुरुष जास्त ताकदवान असतात म्हणून ते मारहाण करतात" ........ 43

५.३ समजूत - "व्यसनामुळे/नशेत मारतो!" ........ 43

५.४ समजूत - "त्यांची भांडणं हा नवरा-बायकोचा 'खाजगी मामला' आहे. ते आत्ता भांडतील आणि नंतर गोड होतील. आपण कशाला त्याच्यामध्ये पडा?" ........ 44

५.५ समजूत - "बाईसाठी घर ही सर्वात सुरक्षित जागा आहे!" ........ 45

५.६ समजूत: "फक्त झोपडपट्टीतच/ कनिष्ठ आर्थिक स्तरांमध्येच हिंसा होते" ........ 45

५.७ समजूत: "बायको ऐकतच नसेल, सारख्या-सारख्या चुका करत असेल तर नवरा मारणारच ना? दहा वेळा सांगूनही तिला समजतच नसेल तर तो तरी काय करणार?" ...... 45

५.८ समजूत - "बाईच बाईची शत्रू असते" ........ 47

५.९ समजूत - “हिंसा करणारा जितका दोषी असतो तितकाच हिंसा सहन करणाराही दोषी असतो” ........ 49

५.१० पितृसत्तेच्या विरुद्ध बोलणे म्हणजे पुरुषांच्या विरुद्ध बोलणे आहे का?........ 51

५.११ मातृसत्ता आल्यास काय होईल? ........ 51

६.० पीडित महिलेप्रति लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोन ........ 52

६.१ पीडित स्त्रीवर कोणकोणत्या प्रकारची हिंसा झाली आहे, हे ओळखणे. ........ 53

हिंसेचे प्रकार: ........ 53

६.२ आपल्याकडे मदतीसाठी आलेल्या पीडित महिलेवर कोणकोणती नियंत्रणे आहेत, आणि कोणत्या नियंत्रणास आव्हान दिल्यामुळे हिंसा होत आहे - ते ओळखणे ........ 53

६.३ लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून प्रतिसाद देणे, समानुभूती व्यक्त करणे ........ 56

६.३.१ पीडित स्त्रीकडे लिंगभाव संवेदनशील (Gender Sensitive) दृष्टिकोनातून पाहिल्यास नेमका काय फरक होईल, याची उदाहरणे खालील तक्त्यात दिली आहेत? ........ 57

६.३.२ काही वेळा पीडित स्त्री शेवटच्या क्षणी केस मागे घेते. असे का? ........ 62

६.४ समानतेसाठी ‘सकारात्मक भेदभाव’ ही संकल्पना लक्षात ठेवणे, आत्मसात करणे........ 62

७.० ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५’ लिंगभाव-संवेदनशील हितकारक कायदा ........ 65

**कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ -** ........ 65

**महत्त्वाच्या तरतुदी** ........ 65

कौटुंबिक हिंसाचाराचा बालकांवर होणारा परिणाम ........ 67

या कायद्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी मन:पूर्वक सदिच्छा. ........ 68

# मार्गदीपिका

## ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’

## **लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा**

## १.० प्रस्तावना

‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५’च्या अंमलबजावणीत सहभागी असलेल्या व पीडित स्त्रीला न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत असलेल्या सर्व ‘सहभागी घटकांना’ (स्टेकहोल्डर्स) आपापल्या जबाबदाऱ्या, लिंगभाव रचनेचा विचार करून, समर्थपणे पार पाडता याव्यात या दृष्टिकोनातून ही मार्गदीपिका तयार करण्यात आली आहे. पीडित स्त्रियांबरोबर काम करताना स्त्रियांवरील हिंसाचाराचा प्रश्न किती गंभीर आणि गुंतागुंतीचा आहे, हे सहभागी घटकांना, या मुद्द्याबाबत संवेदनशील असणाऱ्यांना सतत जाणवत असते. त्याचवेळी कायद्याच्या अंमलबजावणीत अनेक अडथळे-अडचणी येत असतात. त्यातील काही अडचणी या दृष्टिकोनाच्या अभावातून येतात, तर काही कायद्याच्या अंतर्गत असलेल्या जबाबदारीबाबत स्पष्टता नसल्याने येतात. त्यामुळे पीडित स्त्री न्यायापासून अधिकाधिक वंचित राहण्याची शक्यता वाढत जाते. या दोन्हीबद्दलची चर्चा या मार्गदीपिकेत केली आहे.

सदर मार्गदीपिका ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५’ खाली नेमलेल्या ‘संरक्षण अधिकारी’ यांच्या करिता तयार केली आहे. ह्या मार्गदीपिकेत या कायद्याला (सदर कायदा असे संबोधित केले आहे, तर ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण नियम २००६’ ह्याला सदर नियम असे संबोधित केले आहे.

## २.० भारतातील कौटुंबिक हिंसेच्या कायद्याचा पाया

### भारतीय राज्यघटना

लोकशाही आदर्शांवर आधारलेली भारतीय राज्यघटना ही भारतीय कायदा आणि सुव्यवस्थेचा परिपाक आहे. त्यातील विविध अनुच्छेदांद्वारे भारतीय नागरिकांचे हक्क, कर्तव्य, आणि उत्तरदायित्व यांची व्याख्या केली आहे. उदा: राज्यघटनेतील अनुच्छेद २१ अन्वये प्रत्येक व्यक्तीचा  सन्मानपूर्वक जगण्याचा हक्क मान्य केला आहे तर अनुच्छेद १४ अन्वये घोषित केले आहे की कोणतीही व्यक्ती कायद्यासमोर समान मानली जाईल आणि त्या व्यक्तीस कायद्याचे समान संरक्षण मिळेल. अनुच्छेद १५ (१) अन्वये राज्य शासन (अन्य घटकांपैकी) नागरिकांमध्ये लिंगाधारित भेदभाव करणार नाही, इत्यादी. राज्यघटनेतील तरतुदींनुसार राज्य शासनाने नागरिकांच्या मूलभूत हक्कांची हमी देण्यासाठी भारतातील कायद्यांची रचना केली आहे.

अनुच्छेद १४ आणि १५ अन्वये भारतीय राज्यघटना, महिला, बालके, अल्पसंख्याक, दलित, आदिवासी, गरीब अशा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे भेदभाव केल्या जाणाऱ्या असहाय गटांच्या हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याकरता विशेष उपाय करण्यास राज्यसंस्थेस मुभा देते. ह्या उपायात विशेष धोरणे, वेगवेगळे कायदे आणि योजना यांचा समावेश होतो. अशा प्रकारे राज्यसंस्था समानता वास्तवात आणण्यासाठी उपाययोजना करते.

कायद्यासमोर समानता (अनुच्छेद १४) म्हणजे जे समान आहेत त्यांना समानतेने वागवणे आणि जे असमान आहेत त्यांना असमानतेने वागवणे, यावर आधारलेली सापेक्ष समानता. अनेक पिढ्यांपासून भेदभावामुळे महिला असहाय आणि वंचित झाल्याने आता त्यांना समानता प्राप्त करण्यासाठी विशेष संधी मिळावी म्हणून सकारात्मक भेद केला जातो.

म्हणून, जिथे भारतात महिलांच्या बाबतीत पूर्वापार काळापासून सामाजिक भेदभाव केला गेला आहे तिथे आता महिला केंद्रस्थानी ठेवून कायदे पारित केले आहेत. कौटुंबिक हिंसेसंबंधी कायदा हा त्यापैकीच एक आहे. त्यावर या भागात चर्चा केली आहे.

## आंतरराष्ट्रीय कायदा

भारत हा संयुक्त राष्ट्र संघाच्या ‘महिलांच्या विरुध्द होणाऱ्या सर्व प्रकारच्या भेदभावाचे निर्मूलन करणाऱ्या करारावर, १९७९ (CEDAW / ‘सीडॉ’) स्वाक्षरी करणारा आणि कराराला स्वीकृती देणारा एक देश आहे. या करारवर भारताने ३० जुलै १९८० रोजी स्वाक्षरी केली आणि ९ जुलै १९९३ रोजी त्यास सशर्त मान्यता दिली. म्हणून भारतीय राज्यास महिलांच्या विरुध्द होणाऱ्या सर्व प्रकारच्या भेदभावाचे निर्मूलन व्हावे, तो थांबावा यासाठी कायदे करण्याबरोबरच काही पावले उचलणे बंधनकारक आहे. ‘सीडॉ’ने लावलेल्या भेदभावाच्या अन्वयार्थानुसार लिंगाधारित हिंसाचार म्हणजे "केवळ महिला म्हणून अपरिमित प्रमाणात हिंसा करणे, जेणे करून त्या महिलेचे अपरिमित नुकसान होते. त्यात शारीरिक, मानसिक, लैंगिक अपाय होणाऱ्या कृतींचा समावेश असून छळ आणि अशा कृतींच्या धमक्या, जबरदस्ती आणि अन्य प्रकारे स्वातंत्र्यावर घाला घालणे यांचाही समावेश होतो." लिंगाधारित हिंसाचारात कौटुंबिक हिंसा समाविष्ट आहे.

सीडॉच्या सर्वसाधारण शिफारस (जनरल रेकमेंडेशन) १९ अन्वये "कौटुंबिक हिंसा ही महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराचा सर्वात घातकी प्रकार आहे. तो सर्व समाजात अस्तित्वात आहे. कौटुंबिक नातेसंबंधात सर्व वयाच्या महिलांना सर्व प्रकारच्या हिंसेस तोंड द्यावे लागते. त्यात पारंपरिक दृष्टिकोनामुळे टिकून राहिलेले छळ, बलात्कार, अन्य प्रकारचे लैंगिक हल्ले, मानसिक आणि अन्य प्रकारची हिंसा यांचा समावेश होतो. आर्थिक स्वातंत्र्याच्या अभावामुळे कित्येक महिलांना हिंसाग्रस्त नातेसंबंध स्वीकारून राहावे लागते. पुरुषांनी महिलांबाबतच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या झटकून टाकणे हा सुध्दा एक हिंसेचा आणि जबरदस्तीचा प्रकार आहे. या प्रकारच्या हिंसेमुळे महिलांचे आरोग्य धोक्यात येते आणि कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात समानतेने सहभागी होण्याची त्यांची क्षमता नष्ट होते."

भारतीय राज्यघटना आणि भारताची आंतरराष्ट्रीय कराराशी असलेली बांधिलकी यामुळे आपल्या देशात अनेक स्त्री केंद्रित कायदे अस्तित्वात आले. समानतेच्या वास्तविक प्रारूपाच्या (substantive equality model) आधारे भारताने कौटुंबिक हिंसेच्या बाबी हाताळण्यासाठी फौजदारी आणि दिवाणी असे दोन्ही कायदे पारित केले आहेत. **२००५ मध्ये ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण कायदा’ हा विशेष कायदा पारित झाला. हा दिवाणी स्वरूपाचा हितकारक कायदा असून त्या अंतर्गत महिलांना अनेक प्रकारच्या कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण आणि मदतीची हमी मिळते.**

## ३.० लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा

आपण सारेच या समाजव्यवस्थेत जन्माला येतो आणि तेव्हापासूनच या व्यवस्थेचा एक भाग असतो. आपले विचार, दृष्टिकोन आणि पर्यायाने वर्तन आकाराला येण्यात व्यवस्था मोठीच भूमिका बजावते. लिंगाधारित आणि त्या बरोबरीनेच जातीय-वर्गीय विषमतेचे हे ताणेबाणे अक्षरशः गुंतागुंतीचे असतात. या गुंतागुंतीची चर्चा घडवून आणणे, त्यातून सहभागी घटकांची हिंसाचार आणि विषमता याबाबतची स्पष्टता वाढवण्यास मदत करणे, हा मार्गदीपिकेतील या भागाचा प्रमुख उद्देश आहे.

या पुस्तिकेत मुख्यत: स्त्रियांवरील हिंसाचार, हिंसेमागील राजकारण आणि त्याबरोबरच लिंगभाव, पुरुषप्रधानता, पितृसत्तेमध्ये तसेच जात-वर्गीय विषमतेमध्ये असलेली या हिंसाचाराची मुळे याबाबत चर्चा केली आहे. स्त्रियांवरील कोणत्याही प्रकारची हिंसा ही या विषम व्यवस्थारूपी आजाराचे एक लक्षण आहे, याची समज त्यातून दृढ होऊ शकेल, असा विश्वास वाटतो. त्यामुळे पीडित स्त्रियांची न्यायापर्यंत पोहोच आणि हिंसामुक्त जीवनाकडील वाटचाल अधिक सुकर होईल. तसेच हिंसेविरोधात काम करताना सर्वच सहभागी घटकांना येणाऱ्या अडचणींमधून मार्ग काढण्यासाठी या मार्गदीपिकेची मदत होईल.

स्त्रियांनी अन्यायाचा प्रतिकार केल्यास त्यांना त्याची किंमत मोजावी लागते आणि अन्याय सहन करत राहणाऱ्यांना देखील त्याची किंमत द्यावीच लागते, हे इथे आवर्जून लक्षात घेतले पाहिजे.

पीडित स्त्रीला न्यायाच्या बाजूने उभे राहण्यासाठी मदत केल्यास त्याचेही परिणाम होऊ शकतात. पीडित स्त्रीप्रमाणेच मदत करणाऱ्यांवरही वेगवेगळ्या ठिकाणांहून दबाव येऊ शकतो, आमिषे दाखवली जाऊ शकतात किंवा धमक्याही मिळू शकतात. या सगळ्या त्रासातून-अडचणींमधून वाट काढत पीडित स्त्रीचा न्यायापर्यंत पोचण्याचा प्रवास कमीत कमी त्रासदायक होईल याची खात्री करणे, हे आव्हानात्मक काम आहे.

**जिथे शांतता असते तिथे विकास असतो,** हे लक्षात घेतले की शांततापूर्ण सहजीवनासाठी आणि हिंसामुक्त समाजासाठी आपण कार्यरत आहोत, अशी आपल्या मनाशी खूणगाठ बांधता येते.

**कौटुंबिक हिंसा, त्याचे प्रमाण आणि ती का घडते हे समजून घेण्यापासून सुरुवात करूया.**

कौटुंबिक हिंसेच्या काही घटनांची उदाहरणे बघूया -

## घटना १.

सोनालीने मुलीला जन्म दिल्यापासून सुजित नाराज होता. त्याला मुलगाच हवा होता. त्यानंतर वर्षभरातच सोनाली गरोदर राहिली, तेव्हा जबरदस्तीने लिंगनिदान करून, मुलीचा गर्भ असल्याने गर्भपात केला गेला. बाळंतपण आणि नंतरच्या गर्भपाताचा सोनालीच्या शारीरिक-मानसिक आरोग्यावर खूप परिणाम झाला होता. मुलगी दीड वर्षांची झाल्यावर पार्टटाईम नोकरी करावी, हा विचार ती वारंवार बोलून दाखवायची, पण सुजित नकार द्यायचा. एके दिवशी, तिने बोलून दाखवल्यावर सुजितने रागाच्या भरात तिच्या कानाखाली मारली. *"कमवायला मी समर्थ आहे. तुझ्या पैशांवर घर चालवायची गरज नाही"*, सुजित म्हणाला. पुढे अनेक दिवस त्याने तिच्याशी अबोला धरला. भांडणं वाढत गेली आणि शिवीगाळ-मारहाणही.

**विचार करूया:**

१. सुजितला 'मुलगा पाहिजेच आणि मुलगी नको' असे का वाटत होते?
२. "कमवायला मी समर्थ आहे. तुझ्या पैशांवर घर चालवायची गरज नाही" असे सुजित का म्हणत असेल?
३. सोनालीने नोकरी करण्याची इच्छा का दर्शवली असेल?

## घटना २.

लग्नात दोन्हीकडचा खर्च, मानपान करायचा, मुलीच्या अंगावर ११ तोळे सोने घालायचे आणि कार द्यायची एवढीच आपली अपेक्षा असल्याचे अमितच्या आईवडिलांचे म्हणणे होते. *'तुमचीच मुलगी त्या गाडीतून फिरणार आहे की!'*, असेही त्यांनी ऐकवले. आपली मुलगी सुखात राहावी म्हणून प्रियांकाच्या माहेरच्यांनी खर्च करताना मागेपुढे पाहिले नाही. लग्नानंतर महिन्याभरातच, 'अमितला परदेशी जायचे आहे, त्यासाठी तू तुझ्या माहेरहून दोन लाख रुपये घेऊन ये' असे सासू, सासरा आणि अमित या तिघांनीही सांगायला सुरुवात केली. याबाबत अनेक प्रश्न प्रियांका विचारू लागली. ती प्रश्न विचारते आहे, याचा सर्वांना राग येत असे. *"आमच्या घराण्यात मुलींना*

*मोठ्यांचा मान राखायला शिकवलं जातं. तुझ्या माहेरी तोंड वर करून बोललेलं चालत असेल, आमच्याकडे चालणार नाही"* असे तिला वारंवार ऐकवले गेले आणि माहेरचाही उद्धार झाला.

**विचार करूया:**

१. लग्नाचा खर्च मुलीकडच्यांनीच का करायचा असतो?

२. लग्नात हुंडा का द्यावा लागतो?

३. प्रश्न विचारणाऱ्या मुलीला रीतभात नाही, असे का म्हटले जाते?

## घटना ३.

रुखसानाला 'आदर्श अंगणवाडी सेविके'चा पुरस्कार मिळाला. ग्रामसभेला महिलांनी यावे, महिला ग्रामसभा व्हावी म्हणून ती सक्रीय होती. कामाच्या निमित्ताने अनेकांशी तिची ओळख झाली होती. त्यातूनच बशीरच्या मनातील संशय वाढू लागला. त्याने रुखसानावर बारकाईने लक्ष ठेवायला सुरुवात केली. आरोग्य खात्याचा एक पुरुष कर्मचारी तिला एकाच महिन्यात तीनदा भेटायला आल्याचे त्याच्या लक्षात आले. वास्तविक तो कामाच्या संदर्भातच आला होता. पण त्यातून बशीरचा संशय अधिकच बळावला. एके दिवशी रुखसानाला जेवण बनवायला उशीर झाल्याने बशीरचा राग अनावर होऊन तो ओरडला, *'औरत का काम शौहर की सेवा करना होता, गावभर यहांवहां भटकना नही'.* यावर रुखसानालाही राग आला. *'मै क्या खालीपिली भटकती गाव में? काम के वास्तेच जाती ना? और महिनेका पगार मिलता तब गोड वाटतं ना?'* आपली बायको आता आपल्याला दुरुत्तरे करू लागली आहे, असे वाटून तो तिच्या अंगावर धावून गेला. रुखसानाने त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, पण बशीरने अबोला धरला होता. मात्र, इच्छा होईल तेव्हा तो रुखसानाच्या शरीराचा उपभोग घेतच होता. एके रात्री रुखसानाच्या पोटात दुखत असल्याने तिने लैंगिक संबंधांना नकार दिला. त्यामुळे, "हिच्या मनात दुसरा कोणी आहे का?" असे वाटून बशीरचा संशय अधिकच बळावला. नंतरच्या रात्रीही हाच प्रकार झाल्यावर बशीरने जबरदस्तीने तिच्याशी संबंध केले. रुखसानाला त्यामुळे खूप वेदना झाल्या.

**विचार करूया:**

१. बशीर रुखासानावर संशय का घेत होता?
२. बशीरने रुखसानावर लैंगिक जबरदस्ती का केली?
३. बायकोचे शरीर आपल्याला हवे तेव्हा उपभोगता आलेच पाहिजे, तो आपला हक्कच आहे, असे बशीरला वाटत होते का?

या सर्व प्रश्नांची उत्तरे पुढे केलेल्या मांडणीतून मिळू शकतील
अशा अनेक सोनालींवर 'मुलगाच हवा' या कारणासाठी, अनेक प्रियांकांवर हुंड्यासाठी, अनेक रुखसानांवर संशयावरून, मुलींना जन्म दिल्याने; प्रश्न विचारल्यामुळे, मोठ्यांचा अपमान केला म्हणून, पुरुषांशी बोलायला लागली म्हणून, बाहेर जाऊन काम करायला लागली म्हणजे नवऱ्याला/ घरातल्यांना आता ती किंमत देणार नाही म्हणून - या आणि अशा अनेक कारणांवरून - स्त्रियांचा, घरातील, जवळच्या नात्यातील व्यक्तींकडून शारीरिक, मानसिक, लैंगिक, आर्थिक छळ होत असतो. यालाच 'कौटुंबिक हिंसा' असे म्हणतात.

## ३.१ हिंसा आणि कौटुंबिक हिंसा म्हणजे काय?

**कौटुंबिक हिंसा म्हणजे** - कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ (सदर कायद्याच्या) कलम ३ नुसार - स्त्रियांवरील कौटुंबिक हिंसा म्हणजे पीडित व्यक्तीशी संबंधित रक्ताच्या, विवाह, कायदेशीर दत्तक, यासारख्या नात्यात असलेल्या, नवरा, सासू, सासरे, आई, वडील, मुलगा, मुलगी, भाऊ, बहीण अशासारख्या कोणीही त्या स्त्रीवर केलेले हिंसक कृत्य. **ही हिंसा शारीरिक, लैंगिक, भावनिक, आर्थिक अशा कोणत्याही प्रकारची असू शकते.**

**हिंसा म्हणजे** - दुसऱ्यांना इजा होईल असे जाणूनबुजून किंवा नकळत केलेले कृत्य म्हणजे हिंसा. एखाद्या व्यक्तीच्या/समूहाच्या सन्मानाला धोका पोहोचेल, सन्मान दुखावेल असे वर्तन म्हणजे हिंसा.[1]

[1] मानवी हक्क प्रशिक्षण मार्गदर्शिका, मासूम प्रकाशन, पुणे र्शिका

## ३.१.१ हिंसेची आकडेवारी काय सांगते, ते बघूया:

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ४ (NFHS - 4) नुसार -

| | |
|---|---|
| १५ ते ४९ वयोगटातील स्त्रियांपैकी ३०% स्त्रियांनी आयुष्यात एकदा तरी शारीरिक हिंसा अनुभवली आहे, तर ६% स्त्रियांनी आयुष्यात कधीतरी लैंगिक हिंसा अनुभवली आहे. | विवाह झालेल्या ३१% स्त्रियांनी जोडीदाराकडून शारीरिक, लैंगिक किंवा भावनिक हिंसा अनुभवली आहे. शारीरिक हिंसा हा हिंसेचा सर्वाधिक आढळणारा प्रकार आहे (२७%) तर त्याखालोखाल भावनिक हिंसा (१३%) घडते. विवाह झालेल्या ६ % स्त्रियांनी जोडीदाराकडून लैंगिक हिंसा अनुभवली आहे. |
| विवाह झालेल्या ज्या स्त्रियांनी जोडीदाराकडून हिंसा अनुभवली आहे, त्यापैकी एक चतुर्थांश स्त्रियांनी शारीरिक दुखापती झाल्याचे नोंदवले आहे. त्यापैकी ८% स्त्रियांनी डोळ्याला दुखापत, मुरगळणे, सांधा निखळणे, भाजणे आणि ६% स्त्रियांनी खोल जखमा, हाडे मोडणे, दात तुटणे किंवा इतर गंभीर दुखापत झाल्याचे नोंदवले. | राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ४ नुसार, शारीरिक अथवा लैंगिक हिंसा अनुभवलेल्या स्त्रियांपैकी केवळ १४% स्त्रियांनी हिंसा थांबवण्यासाठी कोणाकडे तरी मदतीची मागणी केली. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ३ नुसार हाच आकडा २४% होता |

हिंसेबाबतची आणखी काही आकडेवारी!

- चारपैकी फक्त एका स्त्रीने हिंसा थांबावी म्हणून मदत घेण्याचा प्रयत्न केला. तीनपैकी दोन स्त्रियांनी मदत घेतली नाही एवढेच नव्हे, तर झालेल्या हिंसेबाबत कोणालाही सांगितले नाही. हिंसापीडित महिला बहुतेक वेळा त्यांच्या कुटुंबीयांची मदत घेतात. अतिशय कमी स्त्रिया संस्थात्मक स्रोतांकडून मदत घेतात तर केवळ २% स्त्रियांनी पोलिसांची मदत घेतली.
- ४९८ अ कलमाखालील गुन्ह्यांचे प्रमाण भारतीय दंड विधानाखाली (IPC) दाखल गुन्ह्यांपैकी केवळ ३.८% होते तर गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण २०.९% होते. हुंडाबळीचे (भादंवि कलम ३०४ब खाली दाखल) प्रमाण दाखल गुन्ह्यांच्या फक्त ०.७ % एवढे होते.[2]

**भारतीय स्त्रियांवर होणारा बहुतांश लैंगिक हिंसाचार विवाहांतर्गत होतो.**

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ३ च्या आकडेवारीच्या, आशिष गुप्ता यांनी केलेल्या विश्लेषणानुसार ६.६% स्त्रियांनी (दर १००० पैकी ६६) सांगितले की त्यांनी त्यांच्या नवऱ्याकडून लैंगिक हिंसेचा अनुभव घेतला आहे. त्या तुलनेत, ०.१६% (दर हजारपैकी १.६) स्त्रियांनी सांगितले की त्यांनी नवऱ्याशिवाय इतर पुरुषांकडून लैंगिक हिंसा अनुभवली आहे. स्त्रियांवर होणाऱ्या एकूण लैंगिक हिंसेपैकी विवाहाबाहेरील लैंगिक हिंसेचे प्रमाण केवळ २.३% आहे.

ICRW-UNFPA द्वारे २०१४ मध्ये भारतातील सात मोठ्या राज्यांमध्ये केल्या गेलेल्या अभ्यासात, ३१% पुरुषांनी त्यांच्या जोडीदारांवर लैंगिक हिंसा केल्याचे मान्य केले तर १७% स्त्रियांनी अशी हिंसा अनुभवल्याचे सांगितले. (लैंगिक हिंसेचा अनुभव स्त्रिया कमी प्रमाणात नोंदवतात, असा याचा अर्थ होतो.)

विवाहांतर्गत आणि विवाहाबाहेरील बलात्कारांची नोंद पोलिसांकडे अत्यल्प प्रमाणात होते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या आकडेवारीची २००५च्या राष्ट्रीय गुन्हे नोंदणी कार्यालयाच्या आकडेवारीशी तुलना केल्यावर, विवाहाबाहेरील बलात्काराच्या घटनांपैकी ५.८% बलात्कारांची तर केवळ ०.६% वैवाहिक बलात्कारांची नोंद पोलिसांकडे केली गेली, असे गुप्ता यांना आढळले.[3]

---

[2] राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण - ३, २००५-०६ ची आकडेवारी 'लॉयर्स कलेक्टीव्ह वुमेन्स राईट्स इनिशिएटीव्ह' निर्मित 'एंडिंग डोमेस्टिक व्हायलन्स थ्रू नॉन व्हायलन्स: अ मॅन्युअल फॉर पीडब्लूडीव्हीए प्रोटेक्शन ऑफिसर्स' मधून उद्धृत.

[3] https://www.huffingtonpost.in/2017/08/10/statistically-nearly-all-the-sexual-violence-indian-women-exper_a_23073165/

थोडक्यात, **स्त्रियांवरील हिंसा ही अपवादात्मक घटना नसून एक सार्वत्रिक समस्या आहे**, हे वरील उदाहरणे आणि आकडेवारीवरून दिसून येते. विविध कारणांवरून ही हिंसा घडत असते. ‘हिंसा अटळ आणि योग्यच आहे’ असे आपल्याला वाटत राहते. त्यातूनच अनेक ‘बचावात्मक’ प्रश्न उपस्थित केले जातात. ‘हिंसा काय फक्त स्त्रियांवरच होते का?’ हा त्यापैकीच एक प्रश्न.

## ३.१.२ हिंसा फक्त स्त्रियांवरच होते का?

‘फक्त स्त्रियांवरच हिंसा होते आणि पुरुषांवर होत नाही का?’ असा प्रश्न नेहमी विचारला जातो. समाजात पुरुषांवरही हिंसा होत असते. मात्र त्या हिंसेचे वेगळेपण लक्षात घेतले पाहिजे. उदाः ‘पुरुषी’ नसलेल्या पुरुषांवर हिंसा होते, कारण असे पुरुष ‘पुरुषी’पणाच्या साचेबद्ध प्रतिमांमध्ये बसत नाहीत. आंतरजातीय विवाह केला म्हणून मुलीला आणि ज्याच्याबरोबर तिने विवाह केला त्या मुलालाही मारून टाकले जाण्याच्या अनेक घटना आहेत. उच्चजातीय मुलीशी मैत्री वा प्रेम केले म्हणून तथाकथित ‘खालच्या’ जातीतील मुलाला मारहाण वा त्याला मारून टाकल्याचे प्रसंग घडले आहेत. अल्पसंख्याक पुरुषांना जमावाने मारून टाकण्याच्या घटनांमध्ये अलिकडच्या काळात वाढ झाली आहे. दलित पुरुष, आदिवासी पुरुष, भटक्या जमातीतील पुरुष, विकलांग पुरुष अशा विविध प्रकारे वंचित असलेल्या पुरुषांवर हिंसा होत असते. धर्माच्या नावावर होणाऱ्या दंगलींमध्ये किंवा जातीय संघर्षांमध्ये प्रामुख्याने पुरुषा-पुरुषांमध्ये हिंसा होते.

अर्थात, दलित, आदिवासी, भटक्या जमाती अशा वंचित गटातल्या पुरुषांवर जशी हिंसा होते, तशीच या गटांमधील स्त्रियांवरही – विशेषत: लैंगिक हिंसा - मोठ्या प्रमाणात होते. कारण व्यवस्थेमुळे स्त्रिया अधिकच दुर्बल असतात. उदाः राष्ट्रीय गुन्हे नोंदणी कार्यालयाच्या आकडेवारीनुसार दररोज ४ दलित स्त्रियांवर बलात्कार होतो[4]. धार्मिक दंगलींमध्ये स्त्रियांवर बलात्कार, सामूहिक बलात्कार होत असतात.

[4] संदर्भ: indiaresists.com या वेबसाईटवरील Violence Against Dalit Women: Preliminary Report of National People’s Tribunal हा ७ ऑक्टोबर, २०१३ रोजीचा लेख).

### ३.१.३ बायको (स्त्री) नवऱ्यावर (पुरुष) हिंसा करत नाही का?

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ४ नुसार, विवाह झालेल्या ३% स्त्रियांनी (१५ ते ४९ वयोगटातील), नवरा त्यांना मारहाण किंवा शारीरिक दुखापत करत नसतानाही, नवऱ्यावर कधीतरी हिंसा केली आहे. ३% स्त्रियांनी गेल्या १२ महिन्यांमध्ये अशा प्रकारची हिंसा केल्याचे सांगितले. ज्या स्त्रियांनी जोडीदाराकडून हिंसाचाराचा अनुभव घेतलेला नाही अशांच्या तुलनेत ज्यांनी अनुभव घेतला आहे, अशा स्त्रिया त्यांच्या नवऱ्याविरुद्ध हिंसा करण्याची शक्यता जास्त असते. जोडीदाराकडून हिंसाचाराचा अनुभव घेतलेल्या स्त्रियांपैकी ९% आणि त्या तुलनेत अनुभव न घेतलेल्या १% स्त्रियांनी हिंसा केली.

स्त्रियांनी नवऱ्यावर केलेल्या हिंसेमध्ये फटका, थोबाडीत किंवा लाथा मारणे या प्रकारांचा समावेश आहे.

म्हणजेच, पुरुषांवरही कौटुंबिक हिंसा होत असली तरी हिंसेची तीव्रता आणि परिणामांचे गांभीर्य हे स्त्रियांवरील हिंसेच्या तुलनेत कमी असते. पुरुषांच्या 'हक्कांसाठी' काम करणा-या एका गटाने पुरुषांवर होणाऱ्या हिंसेच्या प्रकारांची यादी दिली आहे. उदाः घरी आल्यावर बायको हातात पाणी देत नाही, वेळेवर जेवायला वाढत नाही, घरी आल्यावर हसून स्वागत केले नाही, बायकोने अबोला धरला इत्यादी!!

अर्थात, स्त्रियांवरील हिंसेविरोधात बोलणाऱ्यांना पुरुषांवरील हिंसा कमी महत्त्वाची आहे, असे म्हणायचे नसून पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांवर अधिक प्रमाणात हिंसा होते, याकडे लक्ष वेधायचे आहे. खरे तर सर्वच प्रकारच्या हिंसाचाराला आपला विरोध असला पाहिजे. याबद्दल अधिक चर्चा आपण पुढे करणार आहोत.

ज्यांच्यावर हिंसा होते आणि जे हिंसा करतात, त्याबाबत विचार करून काही सूत्र त्यात दिसते का, याचा विचार करूया. त्यासाठी हिंसा कोणावर व कशामुळे होते, हे पुढील तक्त्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

### ३.१.४ हिंसा कोणावर व कशामुळे होते?

कोण कोणावर हिंसा करताना सहसा दिसून येते याची उदाहरणे पाहूया. तसेच, या दोन घटकांमधील हिंसेचा स्रोत कोणता/ कुठे आहे याचाही अंदाज घेऊया.

| हिंसा कोण करते | हिंसा कोणावर करते? | हिंसेचा स्रोत कोणता/कुठे? |
|---|---|---|
| श्रीमंत देश | गरीब देशांवर | पैसा/ श्रीमंती |
| श्रीमंत लोक | गरीब लोकांवर | पैसा/ श्रीमंती |
| शासन/संघटित समूह | असंघटित/सामान्य लोकांवर | अधिकार/ हुकुमत/ तज्ञता |
| वयाने मोठी माणसे (उदाः मोठा भाऊ) | वयाने लहानांवर (उदाः धाकट्या भावावर) | वय |
| शिक्षक | विद्यार्थ्यांवर | वय, शिक्षण, पद |
| मोठी माणसे | लहान मुलांवर | वय, पैसा, शरीर |
| `वरच्या’ जातीचे | ‘खालच्या’ जातीतल्यांवर | जात/ जातीची उतरंड |
| धार्मिक, भाषिक व लैंगिक बहुसंख्याक | त्या-त्या गटातील अल्पसंख्याकांवर | संख्या |
| नवरा | बायकोवर | पैसा, पितृसत्ता |
| सासू | सुनेवर | पितृसत्ता |
| सून | सासूवर | पितृसत्ता |

यावरून लक्षात येते की पैसा/ श्रीमंती, वय, अधिकार, जात, तज्ञता जिथे जास्त तिथे हिंसा होण्याची शक्यता जास्त; आणि याचे कारण - या गोष्टी सत्ता बहाल करणाऱ्या आहेत आणि त्या सत्तेचा गैरवापर झाला आहे. यावरून असा निष्कर्ष काढता येतो, की ज्याची सत्ता जास्त तो कमी सत्ता असलेल्यांवर वर्चस्व गाजवेल, हिंसा करेल आणि ज्यांची सत्ता कमी ते जास्त सत्ता असलेल्यांपुढे नम्र, दबून राहतील आणि हिंसेला बळी पडतील. तसेच पितृसत्ताक व्यवस्थेत पुरुषाचे स्थान ‘वरचे’ असल्याने त्याला अधिक सत्ता असते आणि स्त्रीला कमी. लग्नाच्या प्रसंगी ‘मुलाचा बाप’ आणि ‘मुलीचा बाप’ या दोघा पुरुषांमध्ये ‘मुलाच्या बापाची’ सत्ता जास्त असते

कारण तो मुलाचा बाप असतो. थोडक्यात, या उदाहरणामध्ये 'पितृसत्ता' हा सत्ता बहाल करणारा किंवा काढून घेणारा घटक ठरतो. पितृसत्ता म्हणजे नेमके काय, हे पुढील भागात आपण बघूया.

**.........म्हणजेच स्त्रियांवर होणाऱ्या हिंसाचाराचा मुद्दा देखील 'अधिक सत्ता असलेले' आणि 'कमी सत्ता असलेले' यांच्यातील आहे - स्त्री विरुद्ध पुरुष असा नाही.**

**हिंसेमागचे मूळ कारण म्हणजे हिंसक व्यक्तीची सत्तेची हाव. आपल्यापेक्षा कमकुवत व्यक्तीवर नियंत्रण लादून ही व्यक्ती स्वतःच्या सत्तेची महत्त्वाकांक्षा जोपासत, स्वत:ची सत्ता बळकट करीत असते. सत्तेचे स्रोत हे अनेक सामाजिक व्यवस्थांमध्ये असतात - जसे जातीव्यवस्था, पितृसत्ताक व्यवस्था, आर्थिक व्यवस्था इत्यादी. कौटुंबिक हिंसेसंदर्भात सांगायचे झाल्यास, सत्ता व नियंत्रणाची ही महत्त्वाकांक्षा पितृसत्तेच्या व्यवस्थेतून व त्यातील राजकारणातून पुढे येते. ह्याच राजकारणामुळे स्त्री हिंसेची बळी ठरते** - ते कसे हे आपण पुढील मांडणीत बघूया.

आकडेवारी सांगते, कुटुंबात स्त्रियांवर मोठ्या प्रमाणात हिंसा होते, मग ते कुटुंब कोणत्याही जातीचे, धर्माचे, आर्थिक स्तरातील, विभागातील असो. स्त्रियांवर होणाऱ्या या हिंसाचाराचे स्वरूप जखमा, जीवाला धोका, मानसिक खच्चीकरण, सामाजिक परात्मता इ. प्रकारचे असते. कुटुंबाची 'इज्जत' स्त्रियांच्या वर्तनात, त्यांच्या 'मर्यादाशीलते'मध्ये असते, असे मानले जाते. पुरुषाने कसेही वर्तन केले तरी त्यामुळे 'इज्जत' जात नाही. 'इज्जत' गेल्यास त्या स्त्रीला शिक्षा करण्याचा अधिकार पुरुषाला आहे, असे समाज मानतो. त्यामुळे स्त्रियांवर काटेकोर नियंत्रण ठेवले जाते. तिने या मर्यादांचे उल्लंघन केल्यास तिच्यावर हिंसा करणे उचित मानले जाते. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांवर अधिक प्रमाणात कौटुंबिक हिंसा होण्याची शक्यता त्यामुळे वाढते.

कुटुंबातील हिंसाचार, जातीय संघर्ष, धार्मिक दंगली, युद्ध, अशा सर्वच प्रकारच्या हिंसाचाराचा विचार केल्यास हिंसा करणाऱ्यांमध्ये सर्वात जास्त संख्येने पुरुष असतात, हे लक्षात येईल. हिंसा करणाऱ्यांमध्ये स्त्रियाही असू शकतात. सत्तास्थानी असलेल्या स्त्रिया हिंसा करू शकतात. उदाः सासू सुनेचा छळ करते! सुनेवर हिंसा करण्यात सासू, नणंद यांचाही सहभाग असतो, असे अनेक घटनांमध्ये आढळते. मात्र, सासू, नणंद यांना त्यातून घरातल्या पुरुषांची मर्जी टिकवून ठेवायची अथवा प्राप्त करायची असते. कारण त्या जेवढी अधिक मर्जी पुरुषांकडून मिळवतील, तेवढी त्यांची सत्ता वाढत जाते. अनेकदा, स्त्रियांवरील हिंसा असे म्हटल्यावर तरुण, मध्यमवयीन

आणि विवाहित स्त्रियांवर, विशेषतः त्यांच्या नवरा व सासरच्यांकडून होणारी हिंसा डोळ्यासमोर येते. मात्र, केवळ तरुण स्त्रियांवर हिंसा होते असे नसून वृद्ध स्त्रियांवर (आणि पुरुषांवरही) हिंसा होऊ शकते. ही हिंसा बहुतेक वेळा त्यांच्याच अपत्यांकडून घडते.

**समाजातील सर्व माणसे केवळ स्त्री आणि पुरुष याच दोन लिंगाची नसतात. विभिन्नलिंगी माणसेही समाजात असतात. मात्र, त्यांचे अस्तित्व नाकारले जाते. जी माणसे प्रजननक्षम असतात, त्यांनाच या व्यवस्थेत महत्त्वाचे स्थान असते. जे तसे नसतात त्यांचे स्थान नगण्य असते आणि त्यांच्यावर त्या कारणासाठी कुटुंबात आणि समाजात हिंसा होते.**

सर्व वयाच्या, सर्व जातीतील, सर्व धर्मातील, गरीब, मध्यमवर्गीय वा श्रीमंत, अशा सर्वच स्त्रियांना हिंसेचा अनुभव येत असतो. जगभरच कमी अधिक प्रमाणात अशीच परिस्थिती आहे. म्हणजेच या मागे काही संरचना/ व्यवस्था आहे, जी पुरुषांना स्त्रियांच्या तुलनेत अधिक सत्ता देते. स्त्रियांवरील हिंसेविरोधात काम करताना ही ‘संरचना’, ‘व्यवस्था' समजून घेतली की आपण सहभागी व्यक्ती / संस्था हिंसेच्या मुळाशी जाऊन मदत करू शकतो. त्या दृष्टीने महत्त्वाचा शब्द आहे ‘लिंगभाव’.

लिंगभाव म्हणजे काय, लिंगभाव व्यवस्था-नातेसंबंधांची गुंतागुंत कशी असते आणि ही व्यवस्था कौटुंबिक हिंसाचारासाठी वातावरण कसे निर्माण करते, हे समजून घेऊ या. स्त्रियांवरील हिंसाचार ही एक सुटी घटना नसून ती ‘संरचना’ किंवा ‘व्यवस्थे’चा भाग कसा आहे, हे त्यातून स्पष्ट होईल.

बाळ जन्माला आलं की पहिला प्रश्न असतो - “मुलगा” का “मुलगी” आणि याचा आधार असतो जीवशास्त्र किंवा लैंगिक अवयव. मुलगा आणि मुलगी हे जीवशास्त्रीय/नैसर्गिक आहे, मात्र, लिंगभाव यापेक्षा वेगळा आहे.

## ३.२ लिंगभाव म्हणजे काय?

'मुलगी' जन्माला आली, तरी देखील ती 'स्त्री' म्हणून ओळखली/ मानली जाते हे तिच्या काही गुण-वैशिष्ट्यांमुळे. तसेच 'मुलगा' म्हणून जन्माला आला, तरी देखील तो 'पुरुष' म्हणून ओळखला/ मानला जातो तो त्याच्या काही गुण-वैशिष्ट्यांमुळे. ही गुण-वैशिष्ट्ये कोणती - ती बघूया

खालील तक्ता पाहा -

| | **स्त्रियांचे मानले गेलेले गुण** | **पुरुषांचे मानले गेलेले गुण** |
|---|---|---|
| प्रतिमा | नाजूक, लाजाळू, हळवी, नटणारी-सजणारी | दणकट, शूर, मर्द, मर्दानी, संरक्षक |
| अपेक्षा | आज्ञापालन करणारी, नमते घेणारी, सहनशील, कुटुंबासाठी त्याग करणारी | न रडणारा, वर्चस्व गाजवणारा, आज्ञा देणारा |
| भूमिका | स्वयंपाक करणारी, घर सांभाळणारी, आधार घेणारी | कमावता, कर्ता, आधार देणारा, दाता |
| वेगवेगळी सत्ता | स्वयंपाक घरावर मर्यादित सत्ता, सशर्त, सासू झाल्यावर सुनेवर सत्ता गाजवण्याची मुभा | संपूर्ण कुटुंबावर सत्ता, कुटुंबप्रमुख, अंतिम निर्णय देणारा, घराबाहेर कर्तृत्व गाजवण्याची संधी |

या गुणवैशिष्ट्यांचे जणूकाही विभाजनच केले आहे! आणि यातूनच 'आदर्श स्त्री' आणि 'आदर्श पुरुषा'च्या कल्पना तयार होतात. पुरुष जितका या आदर्शाच्या जवळ तितका तो 'खरा मर्द' मानला जातो आणि त्यातून निर्माण होते 'पुरुषत्वाची' संकल्पना. एखादा मुलगा/पुरुष भावनाशील असेल तर "पुरुषासारखा पुरुष असून मुलीसारखा मुळू-मुळू रडतोस?", "बांगड्या भरल्यास का?" अशी वाक्ये त्याला ऐकवली जातात.

तसेच स्त्री देखील तिच्या स्त्रीत्वाच्या संकल्पनेतून स्वतःची तुलना करीत असते. "बाईच्या/मुलीच्या जातीला हे शोभत नाही', 'काय गड्यासारखी मांडी घालून बसलीस?' अशी वाक्ये स्त्रियांच्या बाबतीत उच्चारली जातात.

वस्तुतः पुरुष लाजाळू, हळवा असू शकतो आणि स्त्री शूर, आधार देणारी. स्त्रिया बॉडी बिल्डिंग, वेट लिफ्टिंग करू शकतात. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वतंत्रही असू शकतात. केवळ स्त्रियांच्या

कमाईवर घर चालते अशीही अनेक उदाहरणे दाखवता येतील. मात्र, या साचेबद्ध प्रतिमांमध्ये बसावे (कुणी नावं ठेवू नयेत!), 'आदर्श' व्हावे, म्हणून प्रत्येक व्यक्तीची धडपड सुरू असते.

साचेबद्ध भूमिकांपेक्षा वेगळे वागण्यास समाजमान्यता नसते. कारण पुरुषत्व हे स्त्रीत्वापेक्षा श्रेष्ठ मानले गेले आहे. परंतु त्यातही मुलगी-स्त्री पुरुषत्वाचे मानले गेलेले गुण आत्मसात करत असेल तर ते काही अंशी का होईना, स्वीकारले जाईल किंवा काही वेळा कौतुकही होईल. उदाः 'सैराट' मधील आर्ची. मात्र, पुरुषामध्ये स्त्रीत्वाचे गुण असतील तर ते स्वीकारले जात नाहीत. त्याच्यावर हिंसा वा त्याची टिंगल होण्याची शक्यता अधिक.

या लिंगाधारित साचेबद्धतेला लिंगभाव असे म्हणतात आणि हा व्यवस्थेचा एक भाग आहे. मुलगी जन्माला आली की (व्यवस्थेने ठरवल्याप्रमाणे) तिचे रूपांतर 'स्त्री' मधे - तिच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेतून - केले जाते. त्यातून तिला 'स्त्रीत्वाची' जाण होते. अशीच प्रक्रिया मुलांच्या बाबतीतही घडते. थोडक्यात, लिंगभाव (Gender) आणि नैसर्गिक लिंग (Sex) या संकल्पनेतील फरक पुढे दिलेल्या तक्त्यामध्ये बघता येतील -

| **नैसर्गिक/शारीरिक लिंग (Sex)** | **सामाजिक लिंग/लिंगभाव** (Gender) |
|---|---|
| जीवशास्त्रीय आणि शरीराशी संबंधित. | सामाजिक-सांस्कृतिक |
| बदलणे जिकीरीचे असते | हे बदलत असते |
| पूर्वी जसे होते तसेच आजही आहे.<br>**उदाः** स्त्रियांना मासिक पाळी येणे, पुरुषांना दाढी-मिशा येणे इत्यादी | पूर्वी होते त्यापेक्षा आज काही बदल झाले आहेत.<br>**उदाः** पूर्वी मुलींना शिक्षण दिले जात नव्हते. आता मुली शिक्षण घेतात. |
| **स्थानानुसार**, **समाजानुसार**, **संस्कृतीनुसार बदलत नाही.**<br>स्थान भारत, पाकिस्तान असो किंवा जपान, समाज प्रगत मानला गेलेला असो वा मागास, संस्कृती पौर्वात्य असो वा पाश्चिमात्य, नैसर्गिक लिंग बदलत नाही. | **स्थानानुसार बदलते -**<br>**उदाः** अमेरिकेत साठ वर्षाच्या स्त्रीने स्कर्ट घातल्यास त्यात कोणाला वावगे वाटणार नाही. मात्र, भारताच्या ग्रामीण भागातील स्त्रीने स्कर्ट घातल्यास ते स्वीकारले जाणार नाही |

| नैसर्गिक/शारीरिक लिंग (Sex) | सामाजिक लिंग/लिंगभाव (Gender) |
|---|---|
| स्त्रियांना गर्भाशय असते, वयात आल्यावर मुलांचा आवाज बदलतो इ. | **समाजानुसार बदलते -**<br>**उदाः** ग्रामीण भागात मुलगा मुलगी एकमेकांशी बोलले तर त्यांचे 'काहीतरी' आहे, असे मानले जाते. काही आदिवासी भागात तरुण मुलगा आणि मुलगी लग्नाशिवाय एकत्र राहत असतील तर त्यात गैर मानले जात नाही.<br>**संस्कृतीनुसार बदलते -**<br>**उदाः** भारतात बहुतेक ठिकाणी लग्नानंतर मुलीला मुलाच्या घरी नांदायला जावे लागते. मात्र, ईशान्य भारतातील खासी किंवा केरळमधील नायर जमातीत मुलगा मुलीच्या घरी राहायला जातो. (या प्रथा आता कमी झाल्या आहेत.) |

**"लिंगभाव म्हणजे, त्या त्या समाजात, त्या त्या संस्कृतीत, त्या त्या काळात, त्या त्या लिंगाच्या प्रतिमा, त्या त्या लिंगाकडून केल्या जाणाऱ्या अपेक्षा, त्या त्या लिंगावर लादलेल्या भूमिका आणि त्या त्या लिंगाला बहाल केलेली वेगवेगळी सत्ता"**[5]

उदाः पुरुषाने पहिलवान असणे हे कोल्हापूर-सांगलीच्या भागात अपेक्षित आहे, पण कोकणात नाही (प्रतिमा). उत्तर भारतात स्त्रिया घुंघट घेतात मात्र दक्षिण भारतात घुंघट आढळत नाही (अपेक्षा). स्त्रियांना घरकाम आवडते का आणि पुरुषाला कमावता असणे मान्य आहे का, हे कोणी विचारत नाही (लादलेल्या भूमिका). कोणताही पुरुष त्याच्या घरातील कोणत्याही स्त्रीला 'मला जेवायला वाढ' असे म्हणू शकतो किंवा बाईची सासूपदी 'बढती' झाल्यावर ती सुनेलाही हेच वाक्य म्हणू शकते (बहाल केलेली वेगवेगळी सत्ता).

ही साचेबद्धता लिंगभावामुळे सत्तासंबंध निर्माण करते. त्याबाबत चर्चा करूया.

[5] अनेक व्याख्यांचा विचार करून ही सोपी व्याख्या आनंद पवार (सामाजिक कार्यकर्ते) यांनी तयार केली आहे.

## ३.२.१ लिंगभाव आणि सत्तासंबंध

लिंगभाव व्यवस्थेमुळे स्त्री-पुरुष नात्यामध्ये उतरंड निर्माण होते. तो 'कमावणारा' आणि ती 'घर सांभाळणारी', तो 'बलवान' ती 'नाजूक', तो 'संरक्षक' आणि ती 'रक्षित' इ. अशा भूमिका तिला 'अबला' ठरवतात. सुरक्षिततेच्या नावाखाली तिच्या हालचालींवर नियंत्रण ठेवले जाते. तिने कुठे जायचे, कधी जायचे, कोणाबरोबर जायचे, कोणाशी बोलायचे, कसे वागायचे या सर्व गोष्टींवर नियंत्रण ठेवले जाते आणि त्यासाठी बळाचा आणि हिंसेचा वापर केला जाते. यातूनच निर्माण होतात सत्तासंबंध.

त्यामुळेच हे वर्चस्व आणि दुय्यमत्वाचे नातेसंबंध टिकून राहिले आहेत. निरनिराळ्या संस्कृतींमध्ये आणि अलिकडच्या इतिहासात पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया दुय्यम असणं हा लिंगभाव नातेसंबंधांचा समान पैलू राहिला आहे.

कमला भसीन[6] Understanding Gender या पुस्तिकेत म्हणतात - "लिंगभाव नातेसंबंध याचा अर्थ स्त्रिया आणि पुरुषांमधील सत्तासंबंध". घरामध्ये, स्त्रिया आणि पुरुषांमधील संबंध सौहार्दपूर्ण आणि संघर्ष विरहित असतात, या समजुतीला कमला भसीन आव्हान देतात आणि म्हणतात की "वस्तुत: तिथे सहकार्य असते आणि संघर्षही आणि सौहार्द असते तसेच तणावही".

दुसऱ्या शब्दात, लिंगभाव नातेसंबंधांमध्ये राजकारण असते. इथे 'राजकारण' याचा अर्थ नात्यांमधील सत्तेचा खेळ. यामध्ये अधिक सत्ता असलेली व्यक्ती (पुरुष) कमी सत्ता असलेल्यांवर (स्त्री, मुले) हिंसा करते. सत्तेला आव्हान मिळाले की धडा शिकवण्यासाठी किंवा 'जैसे थे' परिस्थिती राखण्यासाठी हिंसा केली जाते.

## ३.२.२ काळ बदललेला आहे - लिंगाधारित समानता आली आहे - हे खरं आहे का?

"काळ बदललेला आहे", "पूर्वी सारखे राहिले नाही", "समानता आली आहे" - त्यामुळे, "लिंगाधारित समानतेबद्दल बोलण्याची गरज काय?" असे प्रश्न वारंवार विचारले जातात. स्त्रिया राष्ट्रप्रमुख,

[6]या भारतातील प्रख्यात व ज्येष्ठ स्त्रीवादी सामाजिक कार्यकर्त्या आहेत

अंतराळशास्त्रज्ञ, रेल्वे इंजिनचालक, कुलगुरू, विमानचालक, एस.टी. कंडक्टर, जेसीबी चालक, पोलिस अधिकारी अशा अनेकविध भूमिका बजावत असताना, राजकारणातही स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी होत असताना, असा प्रश्न पडणे साहजिकच आहे. खरे तर ‘पुरुषांच्या’ मानल्या गेलेल्या सर्वच क्षेत्रात आज महिलांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. मात्र, एकूण प्रमाण पाहता अजूनही स्त्रियांचे स्थान नगण्यच असल्याचे दिसते. स्त्रिया विमानचालक झाल्या असल्या तरी, फक्त ग्रामीण भागातच नव्हे तर शहरी भागातही बहुसंख्य वाहनचालक अजूनही पुरुषच आहेत, असे दिसून येते. हाच मुद्दा सर्व क्षेत्रांना लागू होतो. शिवाय पुरुषाने एखाद्या क्षेत्रात करिअर करायचे म्हटल्यावर, बहुतेकदा कुटुंबीयांचा त्यांना जसा पाठिंबा मिळतो तसा स्त्रियांना मिळत नाही. हवे ते शिक्षण, त्यासाठी वा नोकरीसाठीचे स्थलांतर, पर्यायाने विवाहाचे वय लांबणे या गोष्टी पुरुषांच्या बाबतीत जितक्या सहजपणे स्वीकारल्या जातील तितक्या सहजपणे स्त्रियांच्या बाबतीत स्वीकारल्या जात नाहीत. शिवाय, कोणत्या जात-वर्गातील स्त्रिया कोणत्या पदापर्यंत आणि का पोचू शकतात, याचीही चिकित्सा करणे गरजेचे आहे.

स्त्रियांनी घराबाहेरील क्षेत्रांमध्ये - प्रतिकात्मक का होईना - आपले कर्तृत्व सिद्ध केलेले असले तरी घरातील जबाबदाऱ्यांमध्ये पुरुष आजही खूप कमी प्रमाणात सहभागी होताना दिसतात. एखादी स्त्री घराबाहेर काही जबाबदारी निभावत असेल तर ‘तिच्या वाट्याचे’ काम त्याच घरातील दुसऱ्या एखाद्या स्त्रीवर पडते किंवा कामवाल्या ताईंवर!

### ३.२.३ लिंगभावामुळे पुरुषांना व स्त्रियांना होणारे फायदे-तोटे

वरील चर्चेवरून हे लक्षात येईल की या रचनेचे कोणाला किती प्रमाणात फायदे होणार आणि कोणाला किती प्रमाणात तोटे होणार, हे लिंगावर अवलंबून आहे. त्यासाठी लिंगभावामुळे पुरुषांना व स्त्रियांना होणाऱ्या फायद्या-तोट्यांची चर्चा करूया. ही चर्चा आपल्या सक्रिय सहभागाने व्हावी, यासाठी काही प्रात्यक्षिक करूया.

जर तुम्ही पुरुष असाल तर पुढील तक्त्यातील कोणते मुद्दे तुम्हाला लागू होतात? जर तुम्ही स्त्री असाल तर यातील कोणते पुरुषांना लागू होतात? त्यावर खूण करा.

| लिंगभावामुळे पुरुषांना होणारे फायदे-तोटे | |
|---|---|
| **फायदे** | **तोटे** |
| □ अधिक सत्ता मिळते.<br>□ आदेश देता येतात (उदाः 'जेवायला वाढ').<br>□ घरकाम करावे लागत नाही.<br>□ भुकेच्या वेळी, ताजे, गरम, पुरेसे अन्न मिळते.<br>□ सर्व प्रकारची सेवा करून घेता येते.<br>□ शिक्षण, आरोग्य, करिअर, मनोरंजन, विश्रांती अशा सर्वच बाबतीत प्राधान्य मिळते.<br>□ बाहेर येण्याजाण्यावर बंधने नसतात.<br>□ निर्णयप्रक्रियेत महत्त्वाचे स्थान असते.<br>□ घराबाहेर कर्तृत्व गाजवताना घरच्यांचा पाठिंबा व सहकार्य मिळते.<br>□ मुले सांभाळण्याचे बंधन नसते.<br>□ पाहिजे तेव्हा बायकोकडून लैंगिक भूक भागवता येते.<br>□ स्त्रियांच्या तुलनेत जोडीदार निवडीचे अधिक स्वातंत्र्य मिळते.<br>□ घरातील स्त्रियांवर व लहानांवर राग काढता येतो.<br>□ आर्थिक बाबीत अंतिम निर्णय तसेच स्वातंत्र्य असते.<br>□ इतर फायदे असल्यास तसे लिहावे .... | □ प्रेम, भीती, दु:ख या भावना मोकळेपणाने व्यक्त करता येत नाहीत.<br>□ कर्ता, कमावता, कुटुंबप्रमुख या भूमिकांना नकार देता येत नाही.<br>□ यामुळे ताण येतो.<br>□ पुरुषत्वाच्या प्रतिमेविरोधात वागल्यास टोमणे, निंदा, अपमान सहन करावा लागतो.<br>□ इतर तोटे असल्यास तसे लिहावे .... |

जर तुम्ही स्त्री असाल तर पुढील तक्त्यातील कोणते मुद्दे तुम्हाला लागू होतात? जर तुम्ही पुरुष असाल तर यातील कोणते मुद्दे स्त्रियांना लागू होतात? त्यावर खूण करा.

| लिंगभावामुळे स्त्रियांना होणारे फायदे-तोटे | |
|---|---|
| **फायदे** | **तोटे** |
| पुरुषांच्या तुलनेत भावना मोकळेपणाने व्यक्त करता येतात. (याचा अर्थ तिला हवे तेव्हा रडता येते असा नाही. ‘भरल्या घरात’ रडणे अशुभ मानले जाते, तर स्त्रियांनी मोठ्याने हसण्यावरही बंधने असतात.)<br>घराबाहेर जाऊन काम करण्याची दगदग करावी लागत नाही (परिणामी अधिकच दुय्यम स्थानी राहावे लागते, शिवाय घरातील कामाचे ओझे असतेच. भांडवलशाही विकासाच्या प्रारूपात, शहरात मोठे घर, गाडी अशी स्वप्ने निर्माण केली जातात तेव्हा मध्यमवर्गात दोघांनी कमावल्याशिवाय विशिष्ट जीवनशैली प्राप्त होऊ शकत नाही. कष्टकरी वर्गात तर दोघांनी काम केल्याशिवाय किमान गरजाही पूर्ण होत नाहीत, ही गुंतागुंत लक्षात घेतली पाहिजे. बाईने घराबाहेर जाऊन काम करायचे की नाही हे वर्ग, जात आणि कुटुंबाची सोय यानुसार ठरते.) | कमी सत्ता मिळते,<br>आदेशांचे पालन करावे लागते.<br>हिंसा सहन करावी लागते.<br>घरकाम करावेच लागते.<br>अनेकदा भुकेच्या वेळी व ताजे, गरम, पोटभर अन्न मिळत नाही. शिळे अन्न खावे लागते.<br>सर्व प्रकारची, घरातील सर्वांची सेवा करावी लागते.<br>शिक्षण, आरोग्य, करिअर, मनोरंजन, विश्रांती अशा सर्वच बाबतीत दुय्यम स्थान मिळते.<br>बाहेर येण्याजाण्यावर बंधने असतात.<br>निर्णयप्रक्रियेत दुय्यम स्थान असते.<br>घराबाहेर कर्तृत्व गाजवताना घरच्यांचा पाठिंबा व सहकार्य मिळण्यात अडचणी येतात.<br>बाहेर पडण्यावर बंधने असल्याने घराबाहेर पडल्याने येऊ शकणारा आत्मविश्वास मिळत नाही.<br>कमावती स्त्री असली तरी घरकामातून सुटका होत नाही. |

लिंगभावामुळे पुरुषांना फायदे अधिक होतात. मात्र त्या तुलनेत तोटे कमी प्रमाणात होतात, असे वरील तक्त्यावरून दिसून येईल. त्याचप्रमाणे लिंगभावामुळे स्त्रियांना तोटे अधिक होतात आणि

‘फायदे’ हे खऱ्या अर्थाने फायदे नाहीत, हे लक्षात येते. या तथाकथित फायद्यांमुळे बाईचे सबलीकरण होते का? नाही. कारण त्यातून त्यांचे परावलंबित्व वाढते आणि स्वातंत्र्याचा संकोच होतो. बाहेर पडण्याची गरज नसल्याने तिला स्वत:चे वाहन घेण्याची शक्यता कमी होते. त्यामुळे कायम दुसऱ्या कोणावर तरी अवलंबून राहावे लागते.

समाजात लिंगभाव व्यवस्था जशी आढळते तशाच इतर विषम व्यवस्थाही आढळून येतात. या सर्व व्यवस्था मिळून एक गुंतागुंत निर्माण होते. सहभागी व्यक्ती / संस्था म्हणून काम करण्यासाठी ही गुंतागुंत समजून घेणे महत्त्वाचे आहे.

## ३.२.४ लिंगभाव व इतर विषमतांची गुंतागुंत

स्त्रियांवरील हिंसेचा मुद्दा समजून घेताना लिंगभाव आणि समाजातील जातीय तसेच आर्थिक विषमता यातून निर्माण झालेल्या गुंतागुंतीचा विचार अपरिहार्यपणे करावाच लागतो, हे पुढील घटनेवरून स्पष्ट होईल.

सुधीरला रूपालीचा प्रेमळ स्वभाव, इतरांना समजून घेण्याची वृत्ती आवडू लागली आणि रूपालीलाही सुधीरचा हसरेपणा, मदत करण्याचा गुण भावला. आपण एकमेकांच्या प्रेमात पडलो आहोत याची जाणीव दोघांना झाली. रूपाली आपले प्रेमसंबंध उघड होऊ नयेत म्हणून काळजी घेत होती. मात्र, तिच्या वडिलांना त्याचा पत्ता लागलाच. त्यांनी विचारल्यावर प्रेमाची कबुली देऊन टाकण्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता. सुधीर ‘खालच्या’ जातीचा असल्याने हे शक्य होणार नाही, तू त्याचा नाद सोडून दे, नाहीतर तुझे शिक्षण बंद करू, अशी धमकी त्यांनी रूपालीला दिली. रूपालीने वाद घालण्याचा प्रयत्न केल्यावर तिला वडिलांनी आणि भावानेही मारहाण केली. रूपालीच्या आईने मध्ये पडायचा प्रयत्न केल्यावर तिलाही त्यांनी शिवीगाळ केली.

**विचार करूया:**

१. आपले प्रेमसंबंध उघड होऊ नयेत, म्हणून - विशेषत: मुलींना - काळजी का घ्यावी लागते?
२. मुला-मुलीने वेगळ्या जातीचा जोडीदार निवडल्यास त्याला विरोध का होतो?
३. मुलींना शक्यतो बाहेरगावी शिकायला का पाठवत नाहीत? पाठवल्यास, ‘आमचा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे, की तू कोणतंही ‘वावगं’ काम करणार नाहीस’ असे का म्हणतात?

**स्त्रियांची ‘योनिशुचिता’ महत्त्वाची मानणारी व्यवस्था रुजवण्यासाठी व टिकवण्यासाठी तिच्यावर अशी बंधने लादली जातात.** ती प्रेमात पडली, तिचे ‘वाकडे पाउल’ पडले तर घराण्याची ‘अब्रू’

जाईल, असे म्हटले जाते.  त्यातूनच, 'बाईची अब्रू हे काचेचं भांडं आहे' यासारखे विचार (!) निर्माण होतात. हे होऊ नये म्हणून मुलींना शक्यतो बाहेरगावी शिकायला पाठवत नाहीत. पाठवलेच तर त्यांनी 'वावगं' काही करू नये म्हणून 'मेंदूधुलाई' (Brain washing) केली जाते.

लक्षात घेऊया - मुली-स्त्रियांवर लहानपणापासूनच बंधने घातली जातात. कसे बोलावे-बोलू नये, कसे हसावे-हसू नये, चालावे-चालू नये, इत्यादी. ही यादी आणखीही वाढवता येईल. तिला खाली मान घालून चालायला शिकवले जाते. पुरुषाच्या नजरेला नजर देऊ नये असेही सांगितले जाते. **जी मुलगी ही बंधने स्वीकारून त्याप्रमाणे वागते ती 'चांगली' 'आदर्श' मुलगी ठरते तर बंधने झुगारणारी 'वाईट चालीची'!**

मुलगी/स्त्री स्वत:हून पुरुषाशी बोलत असेल, पुरुषाकडे बघून हसत असेल, प्रेमात पडली असेल तर त्यातून घराण्याची  'इज्जत/इभ्रत' गेली असे मानले जाते. व्यसन, चोरी, भ्रष्टाचार, हुंडा देणेघेणे यामुळे मात्र घराण्याची इज्जत जात नाही!

**स्त्रियांवरील बंधने जातीव्यवस्था टिकवण्यासाठी महत्त्वाची ठरतात. त्यामुळेच बाबासाहेब आंबेडकर स्त्रियांना 'जातीचे प्रवेशद्वार' असा शब्द वापरतात.** स्वत:चा जोडीदार स्वत: निवडण्याची मुभा स्त्रियांना असती तर 'जात' नावाची व्यवस्था टिकली नसती.

मुलीने जातीबाहेर लग्न किंवा मैत्री केल्यामुळे मुलीचा किंवा/आणि तिच्या प्रियकराचा /नवऱ्याचा खून मुलीच्या वडिलांनी, भावांनी किंवा इतर नातेवाईकांनी केल्याची अनेक प्रकरणे आहेत. याला 'इभ्रती'च्या नावाखाली केल्या जाणाऱ्या हत्या म्हणतात. जातीव्यवस्था टिकविण्यासाठी पितृसत्तेचा आधार घेऊन हिंसा, किंबहुना कौटुंबिक हिंसा, केली जाते.

आपल्याकडे मदतीसाठी आलेली पीडित स्त्री कोण आहे? दलित स्त्री, उच्चजातीय स्त्री, आदिवासी स्त्री, विकलांग स्त्री, गरीब स्त्री, मध्यमवर्गीय स्त्री, श्रीमंत स्त्री, भटक्या जातीतील स्त्री, समलिंगी स्त्री, तरुण स्त्री, वृद्ध स्त्री, विधवा स्त्री, अविवाहित स्त्री....याचा विचार करणे आवश्यक आहे. दलित स्त्री ही स्त्री म्हणून शोषित आहेच पण ती दलित म्हणूनही शोषित आहे. म्हणजे ती दुहेरी शोषित आहे. गरीब भटकी स्त्री ही तिहेरी शोषित आहे. आपल्याकडे आलेली स्त्री नेमकी कोण आहे, ती किती वंचित आहे, हेही लक्षात घेणे आवश्यक असते.

खरे तर, भारतात पितृसत्ता आणि जातीव्यवस्था एकमेकांपासून वेगळ्या करताच येत नाहीत. मात्र, जगात जिथे जातीव्यवस्था अस्तित्वात नाही, तिथेही पुरुषप्रधानता, पितृसत्ता आहे, असे दिसून येते.

पितृसत्ता आजही सगळीकडे दिसून येते. पितृसत्ताक समाजव्यवस्था नेमकी काय आहे याचा विचार पुढील भागामध्ये करूया. त्या आधी पुरुषत्वाची आणि स्त्रीत्वाची घडण कशी होते आणि त्याचा स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेशी काय संबंध आहे, ते पाहूया.

### ३.२.५ पुरुषत्व-मर्दानगीची जडणघडण आणि हिंसा यामध्ये काही परस्परसंबंध आहे का?

समांतरपणे होणारी पुरुषत्वाची आणि स्त्रीत्वाची घडण हा लिंगभावाच्या रचनेचाच भाग आहे. पुरुषत्व/मर्दानगीच्या जडण-घडणीला लहान वयापासूनच सुरुवात होते. उदाः मुलगा रडत असल्यास, 'काय मुलीसारखा रडतोस?' असे म्हटले जाते. किशोरवयात ही जडण घडण आणखीनच पक्की होऊ लागते. समवयस्कांची मान्यता मिळावी म्हणून मुले अनेक गोष्टी करतात. उदाः व्यसन करणे, मुलीची छेड काढणे इत्यादी.

| **पुरुषत्वाची घडण** | **स्त्रीत्वाची घडण** |
|---|---|
| तलवार, बंदूक, बॅट खेळायला देणे | बाहुली, भांडीकुंडी खेळायला देणे |
| आखूड केस | लांब केस |
| हाफ/फुल पँट, शर्ट | फ्रॉक, सलवार कमीज, साडी |
| घराबाहेर पडण्याची संधी | घरातच राहण्याचे बंधन |
| आक्रमक असण्यास प्रोत्साहन | नम्र, मनमिळावू असण्यास प्रोत्साहन |
| घरकाम करणे अजिबात अपेक्षित नाही | आईला घरकामात मदत करणे अपेक्षित |

मर्दानगीची जडणघडण करण्यात माध्यमांचा, चित्रपटांचा मोठाच प्रभाव असतो. दबंग, सिंघम, रावडी राठौड, बाहुबली इ. सिनेमांची नावे बरेच काही सांगून जातात. चित्रपटात नायक जसा नायिकेला 'पटवतो' तसेच वास्तव जीवनात होईल असे मुलांना वाटत राहते. त्यातूनच मुलींचा पाठलाग करणे, छेड काढणे यासारख्या गोष्टी घडतात. मुलींवर ॲसिड फेकणे, त्यांना जिवंत जाळणे किंवा मुलींनी आत्महत्या करणे या त्यापुढील पायऱ्या असतात. तरुण वयात ही घडण

अधिक पक्की होत जाऊन नियंत्रणे करू लागते. उदाः आपल्या बहिणीने/मुलीने एखाद्या मुलाशी बोलायचे किंवा नाही इ. याचे निर्णय मुलीचे भाऊ घेतात.

| मर्दानगीमुळे होणारे फायदे तोटे | |
|---|---|
| **फायदे** | **तोटे** |
| पुरुषांना सत्ता मिळते | अनेक पुरुषांना ताण येतो<br>नात्यांमध्ये उतरंड निर्माण होते<br>अपघात वाढतात<br>भांडणे वाढतात<br>स्त्रियांवरील आणि एकूणच हिंसेत वाढ होते |

पुरुषाला आपल्या मर्दानगीचे सतत प्रदर्शन करत राहावे लागते. काहीना ते आवडत असले तरी तसे वागण्याचा ताण येतो. कठोरपणे वागणे, न रडणे इत्यादी ही याची उदाहरणे. पुरुष सतत कठोरपणाचा मुखवटा घालणारा असेल तर त्यामुळे पत्नी, मुले यांच्याबरोबरच्या नातेसंबंधांवर परिणाम होतो. मनातून बायकोबद्दल कितीही प्रेम असेल तरी ते नवऱ्याला उघडपणे दाखवता येत नाही. त्यामुळे नात्यांमध्ये उतरंड तयार होते. उतरंडीच्या नात्यामध्ये समान पातळीवर संवाद होणे कठीण असते. सतत खेकसणारा नवरा असेल तर तो घरात असल्यावर बायकोला छान वाटेल की घराबाहेर गेल्यावर? 'कडक' वडील घरात आल्यावर मुले चिडीचूप बसत असतील, अभ्यासाचे नाटक करत असतील तर मुलांना वडिलांबद्दल वाटणारा आदर प्रेमातून निर्माण झालेला असेल की भीतीतून? वडिलांना मुले घाबरून राहतात अशी परिस्थिती चांगली की वडिलांना पाहिल्यावर मुले धावत येऊन आनंदाने-प्रेमाने बिलगतात अशी चांगली? जिथे नवरा बायकोत संवादाचा अभाव असेल तिथे हिंसेला पोषक वातावरण असते तर संवादाने अनेक प्रश्न सुटू शकतात. समानतेने वागणे किती आनंददायी असते याचा अनुभव अनेक पुरुषांनी घेतलेला नसतो.

> बायकोशी बरोबरीच्या नात्याने, प्रेमाने-आदराने वागणाऱ्या, तिच्याशी सल्लामसलत करणाऱ्या पुरुषाला नावे ठेवली जातात. उदाः बायकोचा बैल, ताटाखालचं मांजर, बाईलबुद्ध्या, जोरू का गुलाम, बायकाळा, चाट्या, इत्यादी. नवरा-बायकोच्या नात्यात विषमता राहावी, प्रेम-मैत्री निर्माण होऊ नये, म्हणून हे सारे केले जाते.

### ३.२.६ मर्दानगी आणि स्त्रियांवरील हिंसा

पितृसत्ताक व्यवस्थेत ‘मर्द’ पुरुषाने आपल्या कुटुंबातील स्त्रियांवर ‘नियंत्रण’ ठेवणे अपेक्षित असते. त्यासाठी हिंसा करणेही उचित मानले जाते. बायको वा बहिणीवरील हिंसा, ‘इभ्रती’च्या नावाखाली केल्या जाणाऱ्या स्त्रियांच्या हत्या ही याची उदाहरणे आहेत. उच्चजातीय मुलींशी मैत्री, प्रेम वा लग्न केले म्हणून झालेल्या दलित तरुण मुलांच्या हत्या, ही देखील याचीच उदाहरणे आहेत. मुलगी आणि मुलगा दोघेही ‘उच्च’ जातीचे असतील आणि मुलीने जातीबाहेर लग्न केले तरीही दोघांना मारून टाकल्याची उदाहरणे सापडतात. प्रेमविवाह केलेल्यांपैकी दोघेही एकाच जातीचे असतील, मात्र मुलीपेक्षा मुलाकडची आर्थिक परिस्थिती खालची असेल तरीही मुलींना (वा दोघांना) मारहाण झाल्याच्या घटना आहेत.

एका अभ्यासानुसार, भारतातील हिंसाचाराच्या एकूण घटनांपैकी ९५% घटना पुरुषांकडून घडतात! इथे असा प्रश्न निर्माण होतो, की सर्वाधिक हिंसा जर पुरुषांकडून घडत असेल, तर पुरुष जन्मत:च हिंसक असतो का?

खरे तर, पुरुष जन्मत: हिंसक नसतो. मात्र त्याला तसा ‘घडवला’ जातो. पितृसत्ता, जात, धर्म, प्रांत इ. चे राजकारण करणारे या संकल्पनेचा वापर करून पुरुषांना हिंसेला प्रवृत्त करतात. पुरुषत्वाच्या संकल्पनेचा वापर प्रस्थापितांकडून परिस्थिती ‘जैसे थे’ ठेवण्यासाठी केला जातो. ही प्रक्रिया घरात व घराबाहेरही घडत असते.

जन्मत: हिंसक नसल्यामुळे पुरुष बदलू शकतो यावर आपला विश्वास आहे. मात्र, त्याने हिंसक वर्तन सुरूच ठेवल्यास कायद्याची मदत घेणे गरजेचे असते.

> “पुरुष जन्मत: हिंसक असते तर गौतम बुद्धही झाले नसते आणि महात्मा गांधीही!”
>
> - कमला भसीन

थोडक्यात, स्त्रीत्वाच्या आणि पुरुषत्वाच्या या घडणीमुळे स्त्रियांचे सर्वाधिक नुकसान होते. एवढेच नव्हे तर पुरुषांनाही बरेच तोटे सहन करावे लागतात. अर्थात, पुरुषांना त्यातून सत्ताही मोठ्या प्रमाणात मिळतच असते. सत्तेचे वाटप केल्यास जबाबदाऱ्या आणि काम वाढले तरी ताण कमी होऊन खऱ्या आनंदाचा अनुभव मिळू शकतो. त्यामुळेच पुरुषांनी आपली संवेदनशीलता वाढवून

‘मर्द’ बनण्याऐवजी ‘माणूस’पणाच्या दिशेने वाटचाल करणे अवघड असले तरी महत्त्वाचे आहे. त्यासाठी ‘मर्द’पणाचे हे कवच प्रत्येक पुरुषाला झुगारून द्यावे लागेल.

**‘मर्द’ नको, ‘माणूस’ बनूया, स्त्रीलाही ‘माणूस’ म्हणूया!**

## ४.० पितृसत्ता (PATRIARCHY)

‘पितृसत्ता’ म्हणजे 'पित्याची सत्ता' ज्यात संपत्ती पित्याकडून पुत्राकडे (एका पुरुषाकडून दुसऱ्या पुरुषाकडे) वारसाहक्काने जाते. यामध्ये पिता कोण हे महत्त्वाचे असते. माता कोणीही असू शकते.

### ४.१ आजही पितृसत्ता आहे का? आपल्याला ती कोणकोणत्या रूपात दिसते?

या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी पुढील काही प्रश्नाची उत्तरं देऊया -

| | |
|---|---|
| अ. लग्नानंतर जोडीदाराबरोबर राहण्यासाठी कोणाला आपले घर सोडावे लागत नाही? | स्त्रीला/ पुरुषाला |
| आ. लग्नाआधी बाईच्या नावामागे कोणाचे नाव असते? | स्त्रीचे / पुरुषाचे |
| इ. लग्नानंतर बाईच्या नावामागे कोणाचे नाव असते? | स्त्रीचे / पुरुषाचे |
| ई. मुलाच्या नावामागे कोणाचे नाव असते? | स्त्रीचे / पुरुषाचे |
| उ. संपत्तीवर कोणाचे नियंत्रण असते? | स्त्रीचे / पुरुषाचे |
| ऊ. घर सहसा कोणाच्या नावावर असते? | स्त्रीच्या / पुरुषाच्या |
| ऋ. वंश कोणाच्या नावाने चालतो? | स्त्रीचे / पुरुषाचे |
| ऌ. कोणाला हुंडा मिळतो? | स्त्रीला / पुरुषाला |

**या सर्व प्रश्नांची उत्तरे ‘पुरुषाला’ किंवा ‘पुरुषाचे’ अशाच प्रकारची असतील तर पितृसत्ताक व्यवस्था आहे, हे मान्य करावे लागेल.**

## ४.२ पितृसत्ताक व्यवस्थेची काही वैशिष्ट्ये

ज्या व्यवस्थेत पुरुषांचे स्थान श्रेष्ठ, प्रथम असते आणि स्त्रियांचे कनिष्ठ, दुय्यम, त्या व्यवस्थेला पितृसत्ताक समाजव्यवस्था म्हणतात. पित्याकडून पुत्राकडे संपत्तीचा वारसा जातो आणि संपत्तीवरील नियंत्रण हा यातला महत्त्वाचा मुद्दा असतो. पुरुषाला प्राधान्य हे पितृसत्ताक व्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य असते.

### ४.२.१ पुरुषप्रधान समाजव्यवस्था (MALE DOMINATION)

पुरुषप्रधान समाजव्यवस्था म्हणजे अशी व्यवस्था ज्यात घरात आणि घराबाहेर, सर्वत्र पुरुषांचे वर्चस्व असते आणि स्त्रिया पुरुषांपेक्षा कमी दर्जाच्या मानल्या जातात.

**पुरुषप्रधानता कुठे दिसते?** - सर्वसाधारणपणे जी उदाहरणे दिसतात ती खाली दिली आहेत

- कुटुंबाचा प्रमुख पुरुषच आहे असे मानले जाते.
- कुटुंबाबरोबरच, ग्रामपंचायात, बाजारपेठ, पतसंस्था, सहकारी संस्था, कृषी क्षेत्र, राजकारण, प्रसारमाध्यमे अशा सर्व क्षेत्रात प्रामुख्याने पुरुष पदाधिकारी असतात व संख्येने जास्त असतात.
- एक पुरुष व एक स्त्री (भारतात ते एकाच जातीचेही असावे लागतात!) आणि त्यांच्या विवाह संबंधातून झालेली मुले यांनाच **‘कुटुंब’** मानले जाते व ते पुरुषाच्या नावाने ओळखले जाते.
- मूल्य व विचारसरणीही ‘पुरुषसत्ताक’ असते. उदाः एखादी हिंसाग्रस्त महिला पोलिस स्टेशनमध्ये गेली आणि पोलिस (महिला किंवा पुरुष), ‘चालायचंच, नवरा म्हटल्यावर मारणारच. तुझ्यावर प्रेम करतो म्हणून तर मारतो, शेजारणीला थोडाच मारतो?’ असे म्हणाले, तर ती पुरुषसत्ताक विचारसरणी झाली.
- या व्यवस्थेत बाई ही पुरुषांप्रमाणे **‘माणूस’** मानली जात नाही**.** समान हक्क ही तर लांबचीच बाब. अन्न, रोजगार, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, विश्रांती इ. मुद्द्यांचा विचार केला तर या सर्वच बाबतीत पुरुषाला प्रथम तर स्त्रियांना दुय्यम स्थान असल्याचे दिसून येते!
- समलिंगी लैंगिक आकर्षण या व्यवस्थेत ‘अनैसर्गिक’, ‘विकृत’ मानून स्वीकारले जात नाही.

**या व्यवस्थेत स्त्रिया पूर्णपणे सत्ताविहीन असतात का?**

स्त्रिया संपूर्णपणे सत्ताविहीन असतात, असे मात्र नाही. त्यांच्याकडे काही प्रमाणात सत्ता असलेली दिसते. मात्र सर्वोच्च सत्ता बहुतांश वेळेला पुरुषांच्या हाती असते. उदाः महिला सरपंचाला, तिचा नवरा वा उपसरपंच असलेला पुरुष यांच्या वर्चस्वाचा सामना करावा लागतो किंवा सासूकडे सुनेपेक्षा जास्त सत्ता असते.

जात, आर्थिक स्तर, विभाग, देश, इ. नुसार पुरुषप्रधानतेचे स्वरूप वेगळे असू शकते. महाराष्ट्रातील एका भटक्या जातीत लग्नानंतरच्या पहिल्या शरीरसंबंधांच्या वेळी स्त्रीला रक्तस्त्राव झाला नाही, तर तिचे आधी कोणाशी तरी लैंगिक संबंध होते, असे मानून लग्न मोडले जाते. ही मुलीच्या कौमार्याची परीक्षा असते! विधवा किंवा एकट्या स्त्रीची ‘नजर’ लागली म्हणून तिला ‘डाकीण’ ठरवून ठार मारले जाण्याचा प्रकार आदिवासी समाजात दिसतो. एका वृत्तानुसार, ‘छोट्या शहरांमध्ये आणि गावांमध्ये जमीन विवादातील स्त्रियांना डाकीण ठरवले जाते. त्या काळी जादू करतात, असा आरोप केला जातो. २००० ते २०१४ या काळात भारताच्या बारा राज्यांमध्ये २,४१३ स्त्रिया डाकीण ठरवून मारल्या गेल्या’[7].

## ४.२.२ पितृसत्ता उतरंड तयार करते

पितृसत्ता स्त्री-पुरुषांमध्ये उतरंड तयार करते तशीच पुरुषा-पुरुषांमध्ये आणि स्त्रिया-स्त्रियांमध्येही करते.

एखाद्या घरामध्ये ७९ वर्षांचा एक, ५३ वर्षांचा दुसरा आणि २४ वर्षांचा तिसरा आणि १८ वर्षांचा चौथा, असे चार पुरुष असतील तर या सर्वच पुरुषांना घरातील स्त्रियांच्या तुलनेत अधिक सत्ता असेल. मात्र, या चारही पुरुषांकडे सारख्याच प्रमाणात सत्ता नसेल. ७६ वर्षांच्या पुरुषाला घरातील ज्येष्ठ पुरुष म्हणून मान असू शकेल. मात्र, तो थकलेला असेल वा त्याने घरातील लक्ष काढून घेतले असेल तर घरातील सर्वाधिक सत्ता ५३ वर्षांच्या पुरुषाकडे असेल. २४ वर्षांच्या पुरुषाचे ‘पर’

---

[7] द वॉशिंग्टन पोस्ट, २९ सप्टेंबर, २०१६

https://www.washingtonpost.com/world/asia_pacific/its-not-easy-for-women-to-own-land-in-india-one-woman-died-fighting-for-hers/2016/09/29/0e5564f6-654e-11e6-b4d8-33e931b5a26d_story.html?utm_term=.a5b08a11b867

जातीतील मुलीवर प्रेम असेल आणि ५३ वर्षांच्या पुरुषाला ते मान्य नसेल तर 'कर्ता' पुरुष तरुण मुलाला घराबाहेरही काढू शकेल!

अशीच उतरंड स्त्रिया-स्त्रियांमध्येही असेल. याच घरात ७० वर्षांची, ४५ वर्षांची आणि २० वर्षांची अशा तीन स्त्रिया असतील तर तिघींची सत्ता समान असेल का? अर्थातच नाही. ७० वर्षांची स्त्री कर्तीधर्ती असेल तर सर्वाधिक सत्ता तिच्याकडे असेल. पण ती अंथरुणाला खिळली असेल तर ४५ वर्षांची स्त्री सत्ताधारी असेल.

### ४.२.३ स्त्रियांवर नियंत्रणे ठेवली जातात -

पितृसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांवर विविध नियंत्रणे ठेवली जातात. या नियंत्रणाचे स्वरूप वेगवेगळे असू शकते. मात्र, यातील एकही नियंत्रण नाही, अशा स्त्रिया अभावानेच सापडतील.

स्त्रियांवरील नियंत्रणांबाबत सहभागी घटकांना का माहिती असली पाहिजे?

आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, स्त्री अनुभवत असलेले हिंसेचे प्रसंग पितृसत्ताक सत्ताकारणाच्या पार्श्वभूमीवर घडत असतात. वेगळ्या शब्दात सांगायचे झाल्यास, प्रत्येक हिंसा सहन करणा-या स्त्रीच्या हिंसक नातेसंबंधांमध्ये सत्ता-नियंत्रण हा मोठा भाग असतो.

पितृसत्तेने घालून दिलेल्या साचेबद्ध लिंगभाव नियमांना आव्हान दिल्यास, त्या व्यक्तीवर हिंसा होते.

म्हणजेच, पितृसत्ताक व्यवस्था टिकवण्यासाठी, किंबहुना ती बळकट करण्यासाठी आणि नियंत्रण ठेवण्यासाठी हिंसा एक हत्यार म्हणून वापरले जाते. त्यामुळेच, आपल्याकडे मदतीसाठी आलेल्या हिंसापीडित महिलेच्या बाबतीत कोणत्या प्रकारचे नियंत्रण ठेवले जाते, याचा शोध घेणे अतिशय गरजेचे आहे. त्यातून आपण हिंसेच्या मूळ कारणापर्यंत पोचू शकतो. त्या महिलेचे अनुभव समानुभूतीने आपण समजून घेऊ शकतो व तिला योग्य तो आधार देऊ व मदत करू शकतो.

ही नियंत्रणे कोणती आहेत ते समजून घेऊया -

### अ. स्त्रियांवरील नियंत्रणे: श्रम /उत्पादन (LABOUR / PRODUCTION)

स्त्रियांच्या घरातील श्रमांवर पुरुषसत्तेचे (यात पुरुष आणि स्त्रियांचाही समावेश असतो) नियंत्रण असते. घरकामात असंख्य कामे असतात व ही मुख्यत: स्त्रीचीच जबाबदारी मानली जाते. पुरुष घरकामाची फारशी जबाबदारी घेत नाहीत; घेतली तरी अनेकदा ती स्त्रीला ‘मदत’ या दृष्टिकोनातून बघितली जाते. घरातील कामे 'न दिसणारी' असतात, त्यांचे स्वरूप गुंतागुंतीचे, किचकट, कंटाळवाणे असते. त्यामध्ये तोचतोपणा असतो. स्वयंपाक करणे ही सर्जनशील गोष्ट असली तरी ती बहुतेकदा लादलेली असल्याने, त्यात फारसा आनंद नसतो. उलट त्याचा ताणच असतो. घराबाहेर स्त्रीने कितीही जबाबदाऱ्या पार पाडल्या तरी घराची जबाबदारी मुख्यत: तिचीच आहे, असे मानले जाते. ती सुगरण आहे, हे सांगितल्याशिवाय तिच्या बाईपणाला जणू पूर्णत्वच येत नाही. त्याचा अंतिम फायदा पुरुषांना - ताजे, गरम व भुकेच्या वेळी पोटभर जेवण मिळण्यापासून घरात पाहिजे तेवढा आराम मिळण्यापर्यंत - होतो. स्त्रियांच्या घरातील श्रमाला प्रतिष्ठा नसते. मात्र, स्वयंपाकासारख्या कामाला बाजारात भाव आला, की पुरुषही ते करायला तयार होतात. पण घरात या श्रमांचा स्त्रियांना तसा मोबदला दिला जात नाही. अतिश्रमाचा स्त्रियांच्या शारीरिक-मानसिक आरोग्यावर परिणाम होतो.

घरातील श्रमाबरोबरच घराबाहेरील श्रमांवरही पुरुषसत्तेचे नियंत्रण असते. स्त्रीने घराबाहेर जाऊन काम करावे किंवा नाही, कोणते करावे इ. निर्णयांवरही नियंत्रण ठेवले जाते. तिचे घराबाहेर पडणे पुरुषसत्तेला सोयीचे असते तोपर्यंतच स्वीकारले जाते. त्यामुळे बदली, बढती, फिरती, कामावरून घरी येण्याच्या वेळा अनिश्चित असलेल्या, रात्रपाळी करावी लागणाऱ्या नोकऱ्या स्त्रिया शक्यतो स्वीकारत नाहीत किंवा बदली-बढती नाकारतात. नर्सिंगसारख्या कामांमध्ये मात्र बहुतांश स्त्रिया दिसतात, कारण स्त्रिया सेवा चांगली करू शकतात, असे मानले जाते. ‘घर सांभाळण्या’बाबतच्या कुटुंबीयांच्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत, तर स्त्रीवर हिंसा होण्याची शक्यता वाढते.

## आ. स्त्रियांवरील नियंत्रणे: पुनरुत्पादन (**REPRODUCTION**)

मुले केव्हा, किती अंतराने व्हावीत, गर्भनिरोधक कोणते वापरावे, कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया कोणाची व केव्हा करावी याचे निर्णयही पुरुषसत्तेच्या हातात असतात. मातृत्वाचा उदोउदो केला जातो व 'आई झाल्याशिवाय बाईच्या आयुष्याचे सार्थक नाही' असे मानले जाते. मात्र, हे मातृत्व विवाहाअंतर्गतचेच असणे अपेक्षित असते. विवाहांतर्गतचे मातृत्व पूज्य तर विवाहाबाहेरचे मातृत्व त्याज्य मानले जाते.

मूलबाळ सांभाळण्याची मुख्य जबाबदारी बाईचीच आहे असे मानले जाते. त्यामुळे अनेकदा तिच्या करिअरवर परिणाम होतो. वाढते गर्भलिंगनिदान हेही पुनरुत्पादनावरील नियंत्रणच आहे. कारण एक तरी मुलगा झालाच पाहिजे, असे कुटुंबीयांना वाटते आणि सरकार मात्र 'दोनच मुले पुरेत' म्हणून बजावते! या सगळ्याचा स्त्रियांच्या शारीरिक-मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. मूलबाळ होत नसेल वा फक्त मुलीच होत असतील तर स्त्रियांनाच दोष दिला जातो आणि त्यांच्यावर हिंसा होते!

> मनीषा गुप्ते[8] यांच्या मते, 'लग्नाआधी मासिक पाळी चुकत तर नाही ना, याकडे आई डोळ्यात तेल घालून लक्षं ठेवते आणि लग्नानंतर मासिक पाळी कधी एकदा चुकते याकडे सासू डोळ्यात तेल घालून लक्षं ठेवते!' पाळी चुकणे याचा अर्थ गरोदर राहणे. लग्नाआधी कोणत्याही परिस्थितीत गरोदर राहून चालणार नाही आणि लग्नानंतर कोणत्याही परिस्थितीत गरोदर राहिलेच पाहिजे, असे नियंत्रण स्त्रियांवर असते!!

## इ. स्त्रियांवरील नियंत्रणे: लैंगिकता (**SEXUALITY**)

पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीची लैंगिक 'शुद्धता' ही तिच्या जीवापेक्षाही अधिक महत्त्वाची मानली जाते. पदर, घुंघट, बुरखा हे लैंगिकतेवरील नियंत्रणासाठी महत्त्वाचे ठरते. लग्नाआधी कोणाही पुरुषाशी तिचे **'संबंध'** येता कामा नयेत आणि लग्नांनंतर फक्त नवऱ्याशीच असले पाहिजेत असे बंधन असते. पुरुषांवर मात्र असे बंधन नसते. `पुरुषाची जात' म्हणून त्याकडे

[8] स्त्री चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या

दुर्लक्ष केले जाते! **'पुरुषांची लैंगिक भूक जास्त असते'**, अशासारख्या भ्रामक कल्पनाही समाजमान्य आहेत. कधी हीच भ्रामक कल्पना स्त्रियांच्याबाबतही ऐकू येते!

स्त्रियांच्या लैंगिकतेवरील बंधने जातीव्यवस्था टिकवण्यासाठी महत्त्वाची असतात. जातीची तथाकथित 'शुद्धता' टिकावी म्हणून 'वरच्या' मानलेल्या जातीतील स्त्रियांची लैंगिकता काटेकोर बंदिस्त केली जाते. पदर, घुंघट घ्यायला लावण्याबरोबरच खाली मान घालून चालण्याची शिकवणही स्त्रियांना-मुलींना असते. स्त्रियांना जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य नाकारले जाते. सर्वांना - विशेषतः स्त्रियांना - जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य असते तर कोणीही कोणालाही जोडीदार म्हणून निवडले असते आणि जातीव्यवस्था खिळखिळी झाली असती.

बहुतांश शिव्या बाईच्या लैंगिकतेशी संबंधित आहेत. शिव्यांमध्ये स्त्रियांच्या योनीमार्गाचा किंवा इतर शारीरिक अवयवांचा वाईट शब्दांमध्ये उल्लेख केला जातो. अनेक शिव्यांचे अर्थ, आईशी/बहिणीशी लैंगिक संबंध ठेवणारा, स्त्रियांना वेश्याव्यवसाय करायला लावून त्याची दलाली खाणारा, असे होतात.

बालविवाह हे देखील स्त्रियांच्या लैंगिकतेवरच्या नियंत्रणाचे एक रूप आहे. कारण मुलगी जेवढी मोठी, सुशिक्षित, ज्ञानी होईल, तेवढी ती स्वत:चा जोडीदार स्वत: निवडण्याची भाषा करेल आणि तो जोडीदार 'दुसऱ्या' जाती-धर्मातला असू शकेल. ही आपत्ती येऊच नये म्हणून लहान वयातच मुलींचे विवाह उरकून टाकले जातात. वयात आलेली मुलगी हा 'पदरातला जळता निखारा' असतो, यामागची 'विचारधारा' हीच आहे! मुलीचे लग्न 'ठरवून' केले जाणे, हाही याच नियंत्रणाचा भाग आहे.

'संशय घेणे' हे सुद्धा लैंगिकतेवरील नियंत्रण आहे. नवऱ्याला दारूचे व्यसन असेल तर अनेकदा बायकोला तो 'नकोसा' वाटतो. त्याचा तिटकाराही येत असतो. त्यातून 'बायकोची इच्छा कुठेतरी पूर्ण होत असली पाहिजे' असे त्याला वाटत असते. परिणामी त्याचा संशय अधिकच वाढतो. बाईचे 'चारित्र्य' हे तिच्या विरोधकांच्या हातातील महत्त्वाचे शस्त्र असते. गावची सरपंच म्हणून निवडून आलेली महिला सत्ताधाऱ्यांच्या हितसंबंधांना बाधा आणत असेल तर तिला नामोहरम करण्यासाठी तिच्या 'चारित्र्या'चा मुद्दा चर्चेला आणला जातो. एखाद्या कार्यालयात महिलेचा लैंगिक छळ होत असेल आणि तिने छळ करणाऱ्या पुरुषाविरोधात तक्रार दाखल केली असेल तर, 'तिची अनेक पुरुषांबरोबर मैत्री आहे.' 'ती

तसलीच आहे', असे म्हटले जाते. पुरुषाला नामोहरम करण्यासाठी इतर मार्गांचा वापर केला जातो, मात्र क्वचितच 'चारित्र्य' या मुद्द्याचा वापर केला जातो.

## ई. स्त्रियांवरील नियंत्रणे: संचार (**MOBILITY**)

स्त्रीने आवश्यक असेल तरच घराबाहेर जावे आणि 'सातच्या आत घरात' यावे असे बंधन असते. त्यामुळे स्त्रियांचे घरातल्या पुरुषांवरचे अवलंबित्व वाढते. लैंगिकता व पुनरुत्पादनावरील नियंत्रणासाठी संचारावर नियंत्रण ठेवणे गरजेचे असते!

## उ. स्त्रियांवरील नियंत्रणे: मालमत्ता/संपत्ती (**PROPERTY**)

घर, जमीन, शेत, मुले आणि स्त्रिया हे सारे पुरुषांच्याच नावावर असते. पुरुषाच्या नावावर खूप मालमत्ता असल्यास त्यावर कर अधिक असतो म्हणून किंवा स्त्रियांच्या नावावर मालमत्ता केल्यास करात सूट मिळते म्हणून स्त्रियांच्या नावावर मालमत्ता केली जाते. मात्र, शेतात पिके कोणती घ्यायची किंवा घर विकायचे अथवा नाही याचे निर्णय बहुतांश वेळी पुरुषांच्याच हातात असल्याचे दिसून येते. त्यामुळे **मालमत्ता स्त्रियांच्या नावावर असणे आणि मालमत्तेबाबतच्या निर्णयप्रक्रियेवर स्त्रियांचे नियंत्रण असणे यातही मोठेच अंतर आहे**. मालमत्ता स्त्रीच्या नावावर आहे आणि त्यावर नियंत्रणही पूर्णपणे तिचेच आहे, असे फार क्वचित असते. बऱ्याच वेळा मालमत्ताधारक स्त्री ही एकटी स्त्री (अविवाहित, विधवा, घटस्फोटित) असल्याचेही दिसते.

या नियंत्रणांना आव्हान दिल्यास स्त्रीवर हिंसा होण्याची शक्यता असते. त्यामुळे 'पितृसत्ता' आणि इतर संरचना 'जैसे थे' राहाव्यात म्हणून हिंसा हे स्त्रियांना नियंत्रित करण्याचे एक साधन असते.

लग्न ठरवताना, मुलाकडची जमीन, त्याला नोकरी कोणती आहे, ती कायमस्वरूपी आहे का, त्याची आर्थिक परिस्थिती आणि मुलीकडून हुंडा किती मिळणार, हेच मुद्दे महत्त्वाचे ठरतात. देण्याघेण्यावरून अनेकदा लग्ने मोडतात. हुंडा, सोने वा इतर वस्तू हव्यात यासाठी स्त्रियांवर हिंसा होते आणि अनेकदा स्त्रियांना मारून टाकले जाते. काही वेळा स्त्रिया/मुली स्वत: आत्महत्या करतात. हुंडा देण्यासाठी पैसे नाहीत म्हणून मुलींनी वा मुलीच्या वडिलांनी

आत्महत्या केल्याची उदाहरणे आहेत. 'जन्माच्या गाठी', 'आयुष्याची साथ' इ. म्हटल्या जाणाऱ्या नात्याचा पाया हा असा भौतिक-आर्थिक असतो.

| |
|---|
| आयुष्याचा जोडीदार ठरवताना कोणता मुद्दा महत्त्वाचा असला पाहिजे? प्रेम की प्रॉपर्टी? 'प्रेम' हे जर उत्तर असेल तर मुलामुलींनी स्वत:चे जोडीदार स्वत: निवडण्यास, आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहास प्रोत्साहन असले पाहिजे! |

बहीण भावाच्या नात्यातही मालमत्तेचा मुद्दा महत्त्वाचा ठरतो! बहिणीने माहेरच्या संपत्तीत कायदेशीर वाटा मागितल्यास तिचे माहेर तुटण्याची शक्यता असते. बहुतेक वेळा, बहीण जोपर्यंत 'वेड्या बहिणीची रे वेडी माया' म्हणत भावाला ओवाळते, तोपर्यंतच ती भावाची लाडकी असते!

| मालमत्तेवरील नियंत्रणाचा इतर नियंत्रणाशी कसा संबंध आहे? | |
|---|---|
| श्रम | घरकाम करण्यासाठी कोणी व्यक्ती बाहेरून बोलावली तर तिला पगार द्यावा लागेल आणि तो पगार 'कमावत्या' पुरुषाच्या उत्पन्नातून जाईल! पूर्णवेळ घर सांभाळणारी स्त्री असेल आणि अगदीच काही अडचण असेल तरच किंवा घरातील स्त्री जर नोकरी करणारी असेल तर कदाचित घरातील कामाला कोणी स्त्री बाहेरून बोलावली जाईल. पण शक्यतो घरचे सगळे काम सांभाळून घरातली स्त्री घराबाहेर पडून पैसे कमावेल. स्त्रीच्या उत्पन्नातील बहुतांश भाग घर-संसारासाठीच वापरला जाईल. त्यावर स्त्रीचे फारसे नियंत्रण नसते. |
| पुनरुत्पादन | मालमत्तेचा वारस पुरुषच असतो, असे मानले जाते. त्यामुळे वारसदार म्हणून मुलगा हवाच! मुलगी असेल तर हुंडा द्यावा लागेल आणि मुलगा असेल तर हुंडा मिळेल. |
| लैंगिकता | 'स्वत:'पासून झालेल्या मुलालाच मालमत्ता दिली जाईल, 'दुसऱ्या' कोणापासून झालेल्याला नाही! ते मूल 'त्याच' पुरुषापासून झाले आहे याची खात्री करायची असेल तर स्त्रीचा इतर कोणा पुरुषाशी 'संबंध' येऊन चालणार नाही! केवळ नवऱ्याबरोबरच तिचे संबंध आले तरच ते मूल त्याच्याचपासून झाले आहे, असे म्हणता येईल. त्यासाठीच स्त्रीच्या लैंगिकतेवर काटेकोर नियंत्रण ठेवणे आवश्यक मानले जाते!! |

पितृसत्तेने घालून दिलेल्या स्त्रीत्वाच्या नियमांना, पर्यायाने पुरुषांच्या सत्तेला एखाद्या स्त्रीने आव्हान दिल्यास तिच्यावर हिंसेच्या मार्गांनी नियंत्रण घातले जाते. पितृसत्तेची विचारसरणी मान्य असलेले पुरुष आणि स्त्रिया हे नियंत्रण घालण्याचे काम करतात. त्यामुळेच कौटुंबिक हिंसा करण्यात स्त्री आणि पुरुष या दोघांचाही सहभाग असलेला दिसतो.

हिंसा ही सत्ता मिळवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी, तसेच नियंत्रण घालण्यासाठी वापरले जाणारे एक हत्यार किंवा अवजार आहे. याच हिंसेच्या मदतीने पुरुषसत्ता टिकवून ठेवली जाते, अधिक बळकट केली जाते.

## ४.३ पितृसत्तेचे आधारस्तंभ व वाहक (PILLARS OF PATRIARCHY):

पुरुषप्रधान व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी व एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे नेण्यासाठी ज्या संस्था महत्त्वाची भूमिका बजावतात त्या संस्थांना पुरुषप्रधान व्यवस्थेचे आधारस्तंभ व वाहक संस्था असे म्हणतात

### अ. कुटुंबसंस्था

मुलाचा 'पुरुष' आणि मुलीची 'स्त्री' घडवण्याची तसेच पुरुषप्रधानतेचे धडे देण्याची प्रक्रिया, कुटुंबातच घडते. कुटुंबाची संकल्पना व व्याख्या पितृसत्ताक असते.

### आ. धर्मसंस्था:

सर्व धर्म पुरुषप्रधानतेची शिकवण देतात. उदाः बाई ही मुक्तीच्या मार्गातली धोंड आहे, नरक योनीची खाण आहे, शैतान की बेटी आहे इत्यादी. धर्माच्या नावावर दंगली घडवल्या जातात तेव्हा स्त्रियांवर मोठ्या प्रमाणात मुख्यत: लैंगिक अत्याचार होतात

### इ. राज्यसंस्था:

अ. न्यायसंस्था: पोलिस, वकील, न्यायाधीश, समुपदेशक यांचा दृष्टिकोन अनेकदा पुरुषप्रधान असू शकतो. त्यामुळे स्त्रियांना न्याय मिळवण्यासाठी खूप झगडा करावा लागतो.

आ. अर्थसंस्था: बँका, पतपेढ्या, पतसंस्था, विविध कार्यकारी सोसायटी, सहकारी संस्था इ. वर पुरुषांचे वर्चस्व असते. त्यामुळे बाईला 'पत' नसते, असे मानले जाते.

इ. शिक्षणसंस्था: बालवाडीपासून ते विद्यापीठ स्तरापर्यंतच्या अभ्यासक्रमात अनेकदा पुरुषप्रधानता आढळते

ई. राजकारण: राजकारणात स्त्रिया याव्यात म्हणून घटनादुरुस्ती करावी लागली. गाव, तालुका, जिल्हा स्तरावर स्त्रियांसाठी राखीव जागा आहेत. परंतु, विधानसभा आणि लोकसभेत मात्र अद्यापही राखीव जागा नाहीत.

## ई. बाजारपेठ:

अनेक धारणा बाजारपेठ बळकट करते. उदाः स्त्रिया नाजूक असतात आणि पुरुष दणकट. परिणामी पुरुषांच्या दुचाकी गाड्या 'दणकट' तर स्त्रियांच्या 'नाजूक' असतात. गोरे दिसणे, केस लांब असणे हे स्त्रियांच्या सौंदर्याचे लक्षण मानले जाते. त्यासाठीच्या उत्पादनांच्या जाहिराती मोठ्या प्रमाणात केल्या जातात.

## उ. प्रसारमाध्यमे:

टीव्ही, रेडीओ, वर्तमानपत्रे इ. मधून पुरुषप्रधानतेचे सातत्याने पुनरुत्पादन केले जाते. वर्तमानपत्रांच्या वा टी.व्ही. वाहिन्यांच्या प्रमुख संपादकपदी स्त्रिया अत्यंत अपवादात्मक संख्येने दिसतात. लैंगिक संबंधांमधून होणाऱ्या हत्यांच्या बातम्या देताना 'अनैतिक' हा शब्द अनेकदा वापरला जातो. स्त्री-पुरुष संबंधांबद्दलच्या नैतिक-अनैतिकतेच्या संकल्पना/व्याख्या नेहमीच पितृसत्ताक मानसिकतेतून निर्माण होतात. 'परपुरुष' हाही अशा बातम्यांमधून नेहमी वापरला जाणारा शब्द आहे. वर्तमानपत्रातील काही लेखांमधूनही पितृसत्तेचे उदात्तीकरण होताना दिसते.

## ऊ. जाहिराती:

'बायको गेली माहेरी, काम करी पितांबरी' यासारख्या वाक्यांमधून पुरुषप्रधानता अधोरेखित होते. कपडे धुण्याच्या, भांडी घासण्याच्या पावडरी/साबण तसेच संडास घासण्याच्या जाहिरातीत नेहमीच ही कामे स्त्रियांचीच असल्याचे सूचित केले जाते.

सिनेमा आणि टी.व्ही. मालिकांमधून बहुतेक वेळा पुरुषप्रधान मूल्ये आढळतात. अनेक प्रकारे पितृसत्तेचे उदात्तीकरण केले जाते.

## ५.० स्त्रियांवरील हिंसाचाराबाबत कोणकोणत्या समजुती असतात?

स्त्रियांवरीलच नव्हे तर एकूणच हिंसाचार 'मान्यताप्राप्त' असतो. *"मुलीने सासरी उभं जायचं असतं आणि आडवं यायचं असतं"* असे म्हटले जाते. सासरी कितीही अत्याचार झाले तरी तिने ते निमूटपणे सहन केले पाहिजेत, एकवेळ तिचा मृत्यू झाला तरी चालेल; पण तिने सासर सोडून माहेरी येता कामा नये वा इतरत्र कुठे जाता कामा नये, असा याचा अर्थ आहे! अशा संस्कृतीत वाढलेल्यांना हिंसाचार ही एक 'नैसर्गिक' 'अटळ' बाब वाटू लागल्यास नवल ते काय? आपण सारे याच समाजव्यवस्थेत वाढलेलो असल्याने अशा समजुती आपल्याही मनात घट्ट रुजलेल्या असतात. हिंसापीडित स्त्रीला मदत करताना त्या अडथळा बनू शकतात. त्यामुळेच हिंसेला अधिमान्यता देणाऱ्या समजुतींबद्दल चर्चा करणे गरजेचे आहे.

### ५.१ समजूत - "नवऱ्याचे बायकोवर प्रेम असते म्हणून तो तिला मारतो" !

नवरा बायकोलाच मारतो, दुसऱ्या कुठल्या स्त्रीला नाही. त्याची आई, वहिनी, बहीण यांनाही (सहसा) नाही, हेही खरेच. (काही वेळा घरातील इतर स्त्रियांवरही इतर कोणत्या कारणाने तो हिंसा करू शकतो). *"तुझ्यावर प्रेम करतो, म्हणूनच तुला मारतो. शेजारणीला थोडंच मारतो? एखादी थप्पड मारली म्हणून काय झालं?"* हे वाक्य पीडित स्त्रीला अनेकांकडून ऐकावे लागले असेल. अगदी काही मदत करणारे अधिकारी (जसे पोलिस, डॉक्टर, इ.) सुद्धा तिला हे ऐकवतात! 'तो तिला मारतो हे जणू तिचे भाग्यच आहे', असाच हे वाक्य उच्चारणाऱ्यांचा सूर असतो! त्यामुळेच पीडित स्त्रीलाही ते खरेच वाटू लागते!!

स्त्रीवादी कार्यकर्त्या कमला भसीन यांच्या मते, *"प्रेम आहे म्हणून नवरा बायकोला मारतो, तर याचा अर्थ बायकोचे नवऱ्यावर प्रेमच नाही! कारण ती त्याला मारतच नाही!"* नवऱ्यावर प्रेम आहे, म्हणून बायकोने हलकीशी चापट जरी मारली, तरी नवरा ते सहन करेल का? नाही ना? म्हणजेच नवरा बायकोवर प्रेम आहे, म्हणून मारतो असे नसून नवऱ्याची सत्ता जास्त असते म्हणून तो तिला मारतो, हे वास्तव आहे."

एकदा एका पुरुषाने त्याच्या बायकोला थोबाडीत मारली.
बायकोने विचारले, 'मला मारलंत?'
नवरा म्हणाला, 'मग! तुझ्यावर प्रेम आहे, म्हणूनच मारलं ना?'
'अच्छा, असं आहे काय?' असे म्हणून बायकोने आपल्या दोन्ही हातांनी नवऱ्याच्या दोन्ही गालांवर मारले.
नवऱ्याला धक्काच बसला. त्याने विचारले, 'मला मारलंस?'
'मग! माझं तुमच्यावर दुप्पट प्रेम आहे!!' बायको उद्गारली.

**म्हणजेच, पुरुषाची सत्ता जास्त आहे म्हणून तो बायकोवर हिंसा करतो.**

## ५.२ समजूत - “पुरुष जास्त ताकदवान असतात म्हणून ते मारहाण करतात”

मुलगा आणि मुलीत केल्या जाणाऱ्या भेदभावामुळे सर्वसाधारणपणे मुली-स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांना अधिक अन्न-पोषण मिळते. व्यायाम, पुरेशी झोप, विश्रांती वा शरीराची देखभाल करण्याच्या संधीही पुरुषांना अधिक असतात. परिणामी पुरुष अधिक ताकदवान असू शकतात. अर्थात, शारीरिक श्रम करणारी एखादी ग्रामीण स्त्री शहरी पुरुषापेक्षा ताकदवान असू शकते.

मात्र, पुरुष ताकदवान असतात, म्हणून मारहाण करतात हा भ्रम आहे. नवरा दारू पिणारा असेल आणि तो झोकांड्या खात असेल तर बायकोच्या तुलनेत त्याची ताकद कमी पडू शकते. तरीही तो बायकोला का मारतो? शिवाय एखादा पुरुष जास्त ताकदवान असेल आणि तो ज्याच्या शेतावर काम करतो त्याचा मालक किंवा त्या पुरुषाचा बॉस त्या पुरुषापेक्षा कमी ताकदवान असेल, तर हा ताकदवान पुरुष त्याच्यावर हात उचलतो का? नाही ना? बॉस स्त्री असेल तरीही तो तिच्यावर हात उचलू शकत नाही. कारण शेवटी बॉसची/मालकाची सत्ता कर्मचाऱ्यापेक्षा जास्त असते. **थोडक्यात, पुरुषाची सत्ता जास्त आहे म्हणून तो बायकोवर हिंसा करतो**.

## ५.३ समजूत - “व्यसनामुळे/नशेत मारतो!”

*“नशेत त्याला काही कळत नाही, त्यामुळे त्याच्या हातून असं होतं”* असे म्हणून स्त्रीनेच समजून घ्यावे, असे सुचवले जाते. *“दारू प्यायल्यावर तो मारणारच, नाही प्यायला तर मारतो का?”* असा प्रश्न पोलिस वा इतर सहभागी घटकांनाही असू शकतो.

नशेत आहे म्हणून तो रस्त्यात भेटणाऱ्या कोणावर हात उचलतो का? नशेत तो शेजारच्या घराचे दार वाजवतो का? नशेच्या भरात घरातल्या दुसऱ्या कोणाला मारहाण करतो का? मग नशेत तो बरोब्बर बायकोवरच कसा हात उचलतो?

**वास्तव हे आहे, की नशेतही आपली सत्ता नेमकी कुठे चालेल याचे त्याला भान असते!** (नशा करणाऱ्या व्यक्तीची खिल्ली उडवण्याचा इथे हेतू नसून हिंसेला अधिमान्यता देणारे युक्तिवाद कसे पोकळ असतात, ते निदर्शनाला आणण्याचा आहे.)

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ४ नुसार जोडीदाराकडून शारीरिक किंवा लैंगिक हिंसेचा अनुभव हा नवऱ्याच्या दारू पिण्याच्या प्रमाणानुसार बदलतो. ज्यांचे नवरे नेहमी पितात त्यापैकी दोन तृतीयांश स्त्रियांनी हिंसा अनुभवली आहे, तर ज्याचे पीत नाहीत त्यापैकी २१% स्त्रियांना हिंसेचा सामना करावा लागला.

> *"नवऱ्याने मारलं आणि पावसाने झोडलं तर दाद कोणाकडे मागायची?"*
>
> *"लेक नांदली ऐकावी नाही तर मेली ऐकावी"*
>
> - यासारख्या म्हणी हिंसेला असलेली समाजमान्यता दर्शवतात. या म्हणी व्यवस्थेतूनच तयार होतात. केवळ मराठीच नव्हे तर सर्वच भाषांमध्ये अशा प्रकारच्या म्हणी, वाक्प्रचार आढळतात. विषमतावादी म्हणींना पर्यायी समतावादी म्हणी, घोषणा तयार केले जाणे आवश्यक आहे. उदाः 'मुलगा-मुलगी एकसमान, दोघांनाही शिकवा छान'

### ५.४ समजूत - "त्यांची भांडणं हा नवरा-बायकोचा 'खाजगी मामला' आहे. ते आत्ता भांडतील आणि नंतर गोड होतील. आपण कशाला त्याच्यामध्ये पडा?"

*"संसार म्हटल्यावर भांड्याला भांडं लागणारच"* हे आपल्याकडे नेहमी वापरले जाणारे वाक्य. पण हे वाक्य बहुतेक वेळी पीडित स्त्रीने नमते घ्यावे, नवऱ्याने केलेल्या मारहाणीकडे दुर्लक्ष करावे, म्हणून तिचे मन वळवण्यासाठी, तिच्यावर भावनिक दबाव टाकण्यासाठी वापरले जाते. खाली दिलेल्या घटनेवरून हे स्पष्ट होईल .....

> **घटना** - एका गावात नवरा बायकोला जेव्हा खूप मारहाण करत होता. ती जोरजोराने ओरडत होती. कोणीही तिला सोडवायला किंवा त्याला थांबवायला गेले नाही. मारहाणीमुळे ती जखमीही झाली. हिंसक नवऱ्याविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल झाली तेव्हा पोलिसांनी त्याला गाडीत घालून पोलिस ठाण्यात नेले. त्याला सोडवायला गावातले पुढारी आणि काही पुरुष गेले.

<u>लक्षात घेऊया</u> - जेव्हा नवरा बायकोला मारहाण करत होता तेव्हा तो 'खाजगी मामला' असल्याने कोणी सोडवायला गेले नाही. पण हिंसक नवऱ्याला पकडून नेल्यावर त्याला सोडवायला मात्र अनेक जण पुढे आले. तेव्हा मात्र तो 'खाजगी मामला' राहिला नाही!

खरे पाहता, जिथे दोन माणसे एकत्र असतात, तिथे **दोघांमध्ये मतभेद, वाद, भांडणं असणारच! तशीच ती नवरा बायकोत असतील तर आक्षेप असण्याचे कारण नाही. मात्र त्यात कोणत्याही प्रकारची हिंसा असता कामा नये.**

### ५.५ समजूत - "बाईसाठी घर ही सर्वात सुरक्षित जागा आहे!"

मुली-स्त्रियांवर घराबाहेर अनेक अत्याचार होत असतात. छेडछाड, बलात्कार, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ इत्यादी. त्यामुळे अनेक पालक मुलींना घराबाहेर पाठवत नाहीत. मुलगी घरात सुरक्षित राहील असे त्यांना वाटते. मुलीच्या सुरक्षिततेबाबत पालकांना वाटणारी काळजी योग्यच आहे. मात्र, घरे मुली-स्त्रियांसाठी सुरक्षित आहेत का? या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर 'नाही' असेच आहे. कारण स्त्रियांवर घरातही मोठ्या प्रमाणात अत्याचार होतात. **बाहेरच्या तुलनेत घरात अधिक प्रमाणात अत्याचार होतात, हे अनेक संशोधनांमधून सिद्ध झाले आहे.**

### ५.६ समजूत: "फक्त झोपडपट्टीतच/ कनिष्ठ आर्थिक स्तरांमध्येच हिंसा होते"

झोपडपट्टीत जागेचा अभाव असतो. त्यामुळे बऱ्याचदा जे घडते ते 'सार्वजनिक' असते. शहरांमधील वस्त्या व ग्रामीण भागांमध्ये - मध्यम व उच्चवर्गीय फ्लॅट-बंगल्यांच्या, सोसायट्यांच्या तुलनेत - लोक अधिक प्रमाणात एकमेकांशी परिचित असतात. फ्लॅट-बंगल्यांमध्ये अनेकदा दरवाजे बंदच असतात. वस्त्या, गावांमध्ये यापेक्षा परिस्थिती वेगळी असते. त्यामुळे अनेकदा खाजगीपणा जपला जात नाही, हा भाग असतोच. मात्र, बंद दरवाज्यांच्या आडही हिंसा होतच असते. वस्त्यांमध्ये ही हिंसा सहजी लपू शकत नाही. ती उघड असते. त्यामुळे **फक्त वस्त्यांमध्येच हिंसा होते असे नसून सर्वच आर्थिक स्तरांमध्ये हिंसा होते** हे लक्षात घ्यायला हवे.

### ५.७ समजूत: "बायको ऐकतच नसेल, सारख्या-सारख्या चुका करत असेल तर नवरा मारणारच ना? दहा वेळा सांगूनही तिला समजतच नसेल तर तो तरी काय करणार?"

बायकोने नवऱ्याचे सगळे ऐकलेच पाहिजे, ही लिंगभाव-पितृसत्ताकतेतून निर्माण होणारी समज आहे. स्त्रीला घराबाहेर पडताना नवऱ्याला 'विचारून' जावे लागते तर पुरुष 'सांगून' किंवा काही वेळा न सांगताही बाहेर पडतात. घरी परत किती वाजता येणार आहे, हे देखील ते बऱ्याचदा

सांगत नाहीत. 'घरी किती वाजता येणार आहात, ते सांगून जा' असे बायको म्हणाली तर अनेकांना चालत नाही. 'सत्तेपुढे शहाणपण चालत नाही' असाच याचा अर्थ होतो ना? बायकोने फक्त आज्ञापालन करायचे आणि नवऱ्याने आज्ञा द्यायची ही विषमता झाली. बायकोने 'तंबाखू खाऊ नका' सांगितले आणि नवऱ्याने ते ऐकले नाही, तर बायको त्याला मारते का? दहा वेळा सांगूनही अकराव्या वेळेला त्याने व्यसन केले तर ती त्याला मारहाण करते का? कारण 'सत्ता संबंध'! खरे तर, हिंसेचे कोणतेही समर्थन असू शकत नाही. तो हिंसा करतो म्हणून तिनेही करावी असे आपल्याला म्हणायचे नसून 'कोणीच कोणावर हिंसा करणे योग्य नाही' हे आपले प्रतिपादन आहे. कोणत्याही मुद्द्याबाबत चर्चा करणे हाच मार्ग असतो.

'बायको चुकते' म्हणजे काय? - भाजीत मीठ कमी किंवा जास्त पडणे, वेळेवर जेवायला न वाढणे, नवऱ्याने सांगितलेली भाजी - विशेषतः मटण, चिकन - न करणे, नवरा बाहेरून आल्यावर दार उघडायला उशीर होणे, घर स्वच्छ न ठेवणे, मूल रडत असतानाही उचलायला उशीर होणे ही बायकांच्या 'चुकां'ची उदाहरणे म्हणून सांगितली जातात. संवेदनशीलपणे विचार केल्यास यामागे काहीतरी कारणे असू शकतात. उदाः दार उघडायला उशीर झाला असेल तर त्यामागे तिला दरवाजा/बेल वाजवल्याचा आवाज न येण्यापासून हातातील काम त्या क्षणी अर्धवट टाकून येता न येण्यापर्यंत अनेक अडचणी असतील. शिवाय, 'नवरा चुकल्यास बायको मारते का?' हा प्रश्न विचारला गेला पाहिजे.

अपेक्षा पूर्ण न होणे यालाच 'चूक' असे मानले जाते. ही एक नात्यामधील 'समस्या' आहे असे त्याकडे बघितले जात नाही. आणि 'चूक' झाली म्हणून बायकोला (स्त्रीला) शिक्षा देण्याचा अधिकार नवऱ्याला (पुरुषाला) कोणी दिला?

> हिंसा हा समस्या सोडवण्याचा मार्ग असतो, असा समज प्रस्थापित व्यवस्था रुजवते कारण त्यातच प्रस्थापित व्यवस्थेचे हितसंबंध दडलेले असतात! मग ती हिंसा कोणत्याही पातळीवरची असो. खरे तर हिंसा हाच एक गंभीर प्रश्न आहे!!

**थोडक्यात, हिंसेची मुळे सत्ता संबंधात लपलेली आहेत. हिंसेला अधिमान्यता मिळावी म्हणून निर्माण केलेली ही विचारप्रणाली आहे. कोणत्याही परिस्थितीत हिंसेला आपला नकारच असला पाहिजे.**

काही स्त्रिया नवऱ्याने त्यांच्यावर कधीच 'हिंसा' केली नाही, असे कौतुकाने सांगतात. मारहाण झाली नाही, हे चांगलेच आहे. मात्र त्यातून 'या स्त्रियांचे कुटुंबातील स्थान पुरुषांच्या बरोबरीचे होते किंवा कोणत्याही प्रकारचा भेदभाव नव्हता' असा अर्थ काढणे धोक्याचे ठरू शकते. किंबहुना नवरा आणि सासरच्यांना जे हवे ते सगळे या स्त्रियांनी निमूटपणे केले, त्यांच्या सर्वच अपेक्षा पूर्ण केल्या, त्यातच आनंद मानला, असाच अर्थ त्यातून निघतो!!

<u>लक्षात घेऊया</u>- पितृसत्तेत स्त्रीकडून असलेल्या अपेक्षा जर तिने स्वत:हूनच पूर्ण केल्या आणि त्यातच जीवनाची सार्थकता मानली असेल तर नवऱ्याला तिच्यावर हात उचलायची गरज का पडेल? उलट 'आदर्श स्त्री' म्हणून तिचे खूप कौतुकच होईल!! ('बघ, बघ, तिचा आदर्श घे' हे वाक्य अनेक स्त्रिया-मुलींना ऐकवले गेलेले असते!)

## ५.८ समजूत - "बाईच बाईची शत्रू असते"

सासू सुनेला त्रास देते किंवा आईच मुलीला आहार कमी देते. त्यामुळे 'बाईच बाईची शत्रू असते', असे अनेक जण म्हणतात. सासू सुनेला त्रास देते, हे खरेच आहे. मात्र, सासू सुनेला कोणकोणत्या कारणांमुळे त्रास देते, याच्या खोलात जाणे आवश्यक आहे. काही उदाहरणे पाहूया .....

उदाः 'वंशाला दिवा देत नाही' म्हणून सासू सुनेला छळत असेल, तर, <u>विचार करूया</u> - वंश कोणाचा चालतो? सासरा आणि मुलगा यांचा. म्हणजे यात सासूचा थेट फायदा काय असतो?

उदाः हुंड्यासाठी सासू सुनेला त्रास देते आणि सुनेला हुंड्यासाठी जाळण्यात सासूचाही सहभाग असतो, हे वास्तवच आहे. <u>विचार करूया</u>- मात्र, येणारा हुंडा/पैसा कोणाच्या हातात/कोणाच्या फायद्यासाठी येतो? याचेही उत्तर 'पुरुषाच्या' असेच आहे.

उदाः 'माहेराहून चारचाकी गाडी घेऊन ये' म्हणून सुनेला छळणारी सासू. <u>विचार करूया</u>- चारचाकी गाडी स्वत: सासू चालवणार असते का? गाडीच्या चाव्या सासूच्या ताब्यात राहणार असतात का? गाडी कागदोपत्री सासूच्या नावावर केली जाते का?

उदाः राजकारणात वा संपत्तीसाठी पुरुष दुसऱ्या पुरुषाचा (भाऊ सख्ख्या भावाचाही) खून करण्याच्या घटना घडतात. <u>विचार करूया</u>- जातीय, धार्मिक, प्रांतवादी आणि राष्ट्रप्रेमाच्या नावाखाली होणाऱ्या हिंसाचारामागे पुरुषा-पुरुषांमधील सत्तासंघर्षच कारणीभूत असलेला दिसून येतो. मात्र, तरीही 'पुरुष पुरुषाचा शत्रू असतो' असे वाक्य कधीही ऐकू येत नाही!

मुळात दोष द्यायचा तर व्यवस्थेला द्यावा. बहुतांश प्रकरणात सासू सुनेला छळत असेल तर सून सासूला छळत असल्याच्या काही घटनाही आढळतात. कारण **या व्यवस्थेत आपण समानतेवर आधारित नाती निर्माण न करता केवळ सत्ता मिळवण्याचा आणि ती मिळाली की आपल्यापेक्षा सत्तेने कमी असलेल्यांवर सत्ता गाजवण्याचा प्रयत्न करत असतो.**

सासू आणि आई, या पितृसत्तेच्या वाहक असतात. सुनेचे सासूपद हे बाईला तिने मुलगा जन्माला घातल्याबद्दल आणि नियंत्रणे मान्य केल्याबद्दल मिळालेली 'बढती' असते. कोणत्याही शोषणव्यवस्थेमध्ये शोषितांना काही अंशी सत्तेत सहभाग द्यावाच लागतो. तरच ती व्यवस्था टिकून राहू शकते.

**थोडक्यात 'बाईच बाईची शत्रू असते' हे वाक्य एकतर पुरेशा विश्लेषणाअभावी किंवा पितृसत्ताक मानसिकतेतून येते.** मात्र तरीही, सासू सुनेला वा सून सासूला त्रास देत असेल तर ते निषेधार्हच आहे, अशी आपली भूमिका असली पाहिजे.

हिंसा आणि लिंगभाव-पितृसत्तेचा हा परस्परसंबंध लक्षात घेतला की 'कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण कायद्या' अंतर्गत सहभागी  व्यक्ती / संस्था म्हणून काम करताना, आपला दृष्टिकोन लिंगभाव संवेदनशील असणे का गरजेचे आहे, हे लक्षात येते.

स्त्रियांवरील हिंसाचाराची मुळे पितृसत्ताक समाजव्यवस्थेत आहेत. पितृसत्तेबरोबरच जातीव्यवस्था व वर्गव्यवस्था याही स्त्रियांवरील व एकूणच हिंसाचारामागील 'संरचना' (Structures) आहेत. कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ व स्त्रियांच्या (तसेच इतर वंचितांच्या) हक्कांसंबधातील इतर कायदे करताना या 'संरचना' लक्षात घेतल्या गेल्या आहेत. म्हणून या कायद्यांची अंमलबजावणी करतानाही त्या लक्षात घेतल्या पाहिजेत.

'माहेराहून चारचाकी गाडी घेऊन ये' म्हणून सुनेला छळणारी सासू चारचाकी गाडी स्वत: चालवणार असते का? गाडीच्या चाव्या सासूच्या ताब्यात राहणार असतात का? गाडी कागदोपत्री सासूच्या नावावर केली जाते का?

### ५.९ समजूत - “हिंसा करणारा जितका दोषी असतो तितकाच हिंसा सहन करणाराही दोषी असतो”

हे अतिशय लोकप्रिय वाक्य आहे. मात्र, स्त्रिया हिंसा सहन करत का राहतात, याचा विचार करणे महत्त्वाचे आहे.

मुळात स्त्रिया स्वत:वरच्या हिंसेला मान्यता देतील, अशा प्रकारे त्यांची जडणघडण केली जाते. त्यामुळे, **‘नवरा म्हटल्यावर मारणारच’** असे स्त्रियांना आणि एकूणच समाजालाच वाटत असते. असे का होते, यासाठी **‘विचारप्रणाली’**चा मुद्दा समजून घेतला पाहिजे. अर्थात, बायकोला मारहाण करणे भूषणावह समजले जात नसले तरी, हिंसेमागची कारणे समाजमान्य आहेत. त्याची मुळे सत्तासंबंधात, लिंगभावात, स्त्रीकडे तुच्छपणे बघण्याच्या भूमिकेत आहेत. कोणत्याही परिस्थितीत हिंसा केली जाता कामा नये, या टप्प्यापर्यंत आपला समाज पोचण्यास अजून मोठाच पल्ला बाकी आहे.

मुलीने ‘आदर्श’ स्त्री व्हावे यासाठी लहान वयापासूनच तिच्या मनात ‘चांगली’ आणि ‘वाईट’ अशा द्विभाजित म्हणजेच दोन परस्परविरोधी टोके असलेल्या प्रतिमा निर्माण केल्या जातात. खाली मान घालून चालणारी, पुरुषाच्या नजरेला नजर न देणारी, आई-वडिलांनी ठरवून दिलेल्या मुलाशी(च) लग्न करणारी, नवरा, सासू-सासरे कितीही वाईट वागले तरी ते सहन करणे हे स्वत:चे कर्तव्यच समजणारी, सौभाग्यलेणी अंगावर मिरवणारी, उपास-व्रतवैकल्ये करणारी, सहनशील, अडीअडचणीला स्वत:चे दागिने स्वत:हून नवऱ्याच्या हवाली करणारी, असे ‘आदर्श’ स्त्रीचे अनेक ‘गुणधर्म’ मानले जातात. थोडक्यात, पितृसत्तेची सर्व नियंत्रणे मान्य करणारी स्त्री ‘आदर्श’ तर या निकषांमध्ये न बसणारी स्त्री ‘वाईट चालीची’, ‘कुलटा’, ‘आगाऊ’ इत्यादी ठरवली जाते. आपल्याला ‘आदर्श’ किताब दिला जावा, म्हणून प्रत्येक स्त्री धडपडत असते. ‘आदर्श’ स्त्रियांना लग्न, ‘सवाष्ण भोजन’ यासारख्या ‘मंगल’ प्रसंगी मान असतो! हे सारे करणाऱ्या स्त्रीची सत्ता हळूहळू वाढत जाते. सत्ता मिळवण्याचे इतर समाजमान्य मार्ग स्त्रीला नसल्याने, हे सारे करण्यासाठी त्या धडपडत राहतात.

आधुनिक संकल्पना वापरायची तर स्त्रियांमध्ये त्या ‘आदर्श’, ‘सहनशील’ इ. व्हाव्यात म्हणून ‘प्रोग्रॅमिंग’ केले जाते. त्यामुळे, घराबाहेर जाऊन काम करायचे वा नाही, याबाबत त्यांची वेगवेगळी स्वप्ने असू शकतील, मात्र बहुतेकींना ‘आदर्श’ गृहिणी व्हायचेच असते.

आपल्यावर हिंसा होत असेल तर स्त्रिया स्वत:लाच दोष देतात. मुलगा होत नाही, हुंडा दिला नाही, स्वयंपाक येत नाही या सगळ्यात आपलाच दोष आहे, असे त्यांना आणि इतरांनाही वाटत असते. ही विचारसरणी बदलणे हे मोठे आव्हान आहे.

सक्तीची सत्ता आणि संमतीची सत्ता: एका विचारवंताने 'संमतीची सत्ता' ही संकल्पना मांडली आहे. ज्यांचे शोषण करायचे आहे, त्यांच्यावर हिंसा केली जाते, ही झाली 'सक्तीची सत्ता'. मात्र हिंसेबरोबरच शोषित स्वत:च शोषणाला संमती देतील अशी विचारप्रणाली निर्माण केली जाते. कोणतीही शोषण व्यवस्था याच कार्यनीतीचा वापर करते. त्यातून ही व्यवस्था आपल्या भल्यासाठीच आहे, असे शोषितांनाही वाटू लागते. त्यामुळेच ते स्वत:च या व्यवस्थेचा भाग बनतात. स्वत:च स्वत:वर बंधनेही घालून घेतात. व्यवस्थेने घालून दिलेल्या नियमांना प्रश्न विचारणे तर दूरच, उलट त्याचे पालन करण्यातच धन्यता मानू लागतात! त्यातच आयुष्याचे सार्थक आहे, असेही त्यांना वाटत असते. नवऱ्याला दीर्घायुष्य मागणे (स्वत:ला मात्र नाही!), 'भरल्या कपाळाने' मरण्याची आकांक्षा बाळगणे, शिळे अन्न स्वत: घेणे आणि मुलींना देणे, स्वत:च डोक्यावरचा पदर खाली पडू न देणे, उपासतापास करणे, घरातल्या पुरुषाला इकडची काडी तिकडे करावी लागू नये म्हणून धडपडणे, माझ्याशिवाय माझ्या नवऱ्याचं-मुलांचं कसे होईल या विचारातून स्वत: कुठे जाणे टाळणे किंवा बंधने घालून घेणे इत्यादी सारी संमतीच्या शोषणाची उदाहरणे आहेत. अर्थात, या संमतीची मुळे पितृसत्ता, लिंगभाव, जात, वर्ग, धर्म यामध्ये आहेत.

नवऱ्याच्या वा भावाच्या सुखातच आपले सुख सामावलेले आहे, असे वाटणे हे ही 'संमतीच्या सत्ते'चे आणखी एक उदाहरण. त्यामुळे त्या 'घरकाम ही फक्त एकट्या स्त्रीचीच जबाबदारी का असावी?' असे प्रश्न विचारणे टाळतात आणि माहेरच्या संपत्तीत तर स्वत:हून सहसा हक्क मागतच नाहीत किंवा हक्कसोडपत्रावर सही करायला तयार होतात!

'सहनशील' असणे हा स्त्रीचा महत्त्वाचा गुण मानला जातो. स्त्री नैसर्गिकरित्याच 'सहनशील' आहे, असे अनेकांचे मत असते. 'नवऱ्याचे दुसऱ्या बाईशी संबंध असले तरी आज ना उद्या तो सुधारेल' अशी अशा तिच्या मनात असते. स्वाभिमान दाखवायचा तर, ती राहणार कुठे, खाणार काय, मुले असतील तर त्यांचे काय, असे अनेक प्रश्न असतात. त्यामुळे स्त्रीला हिंसा सहन करत राहण्याशिवाय पर्याय नसतो.

लग्न ठरवतानाच बायको नवऱ्यापेक्षा वरचढ होणार नाही, याची खबरदारी घेतली जाते. मुलीपेक्षा मुलाचे वय, शिक्षण, उंची आणि उत्पन्न अधिकच असले पाहिजे, हे गृहीत धरले जाते.

> स्त्रिया (वा इतर वंचित गट) हिंसा का सहन करत राहतात, यामागे गुंतागुंतीची परिस्थिती असते. ती संवेदनशीलपणे समजून घेणे आवश्यक आहे. तिच्या जागी आपण असतो तर आपणही कदाचित तेच केले असते.

## ५.१० पितृसत्तेच्या विरुद्ध बोलणे म्हणजे पुरुषांच्या विरुद्ध बोलणे आहे का?

नाही. पुरुषप्रधानते/पितृसत्तेविरूद्ध बोलणे म्हणजे पुरुषांविरुद्ध बोलणे नाही. सुनेला छळणाऱ्या सासूविरुद्धही आपण बोलतो. 'जे पुरुष बायकोवर हिंसा करतात, त्यांना जाऊन धोपटा' असे आपण कधी म्हणत नाही आणि पुरुषांवर होणाऱ्याच नव्हे तर कोणत्याही प्रकारच्या हिंसेचे समर्थनही करत नाही. हिंसा संपवण्यासाठी हिंसेचाच मार्ग वापरणे उचित नाही. मुळात, संरचनात्मक पाया असलेला हिंसाचार थांबावा यासाठी संरचनात्मक उपायच करावे लागतील. पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे पुरुषाकडे अधिक सत्ता असते तर स्त्रियांकडे कमी. त्यामुळे सत्ता संबंधांचा विचार करून दोघांचीही सत्ता समान असावी अशी भूमिका आहे. व्यक्तीला शत्रू मानून व्यवस्था बदलत नसते, याचे भान ठेवणे आवश्यक आहे.

## ५.११ मातृसत्ता आल्यास काय होईल?

- लग्नानंतर पुरुषांना बायकोच्याच घरी सक्तीने नांदायला जावे लागेल. घरकाम ही पुरुषांचीच जबाबदारी असेल. 'तुझ्या आईबरोबर मी म्हणून नांदलो. दुसरा एखादा असता तर पळून गेला असता' असे वडील मुलाला म्हणतील!
- मुली मुलांची छेडछाड, पाठलाग करतील. मुले खाली माना घालून तिथून घाईघाईने निघून जातील. छेडछाडीला 'मुले तंग कपडे घालतात' म्हणून मुलांनाच जबाबदार धरले जाईल आणि मुलांचे शिक्षण बंद केले जाईल.
- स्त्रिया 'कर्त्या' असतील. नवऱ्याने घराबाहेर जाऊन काम करायचे की नाही हे स्त्रिया ठरवतील. मालमत्ता स्त्रियांच्याच नावावर असेल.
- आपला भाऊ कोणा मुलीशी बोलतो यावर बहिणी बारकाईने लक्ष ठेवतील. एखाद्या मुलीबरोबर त्याची मैत्री वाढू लागल्याचे दिसताच त्याचे शिक्षण बंद केले जाईल. मुलाची बहीण त्याच्या मैत्रिणीला चोप देऊन येईल. मुलाचे बळजबरीने दुसऱ्या मुलीशी लग्न लावून दिले जाईल.

- वयात आलेला मुलगा हा ‘धोतरातला जळता निखारा’ मानला जाईल.
- स्त्रिया नवऱ्यांना गुलामासारखे वागवतील. त्यांच्यावर हिंसा करतील. स्वयंपाक नीट करत नाही, दुसऱ्या बाईशी बोलतो, त्याचे पोट सुटले, अशी कारणे त्यामागे असतील. ‘कौटुंबिक हिंसेपासून पुरुषांचे संरक्षण कायदा’ सरकारला करावा लागेल.
- ‘टाकलेला पुरुष’ सारखे शब्दप्रयोग असतील तर ‘माझ्या बायकोचा नवरा’ अशी टीव्हीवरच्या मालिकांची नावे असतील....

अशी कल्पना करणे सुद्धा अन्यायकारक वाटते ना? मग ‘मातृसत्ता’ अन्यायकारक वाटत असेल तर ‘पितृसत्ता’सुद्धा अन्यायकारक नाही का? मात्र, पितृसत्तेच्या जागी मातृसत्ता आणणे हा आपला उद्देश नसून आपल्याला `समानता' हवी आहे.

## ६.० पीडित महिलेप्रति लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोन

लिंगभाव, त्यातून निर्माण होणारे सत्ता-संबंध, पुरुषत्व-मर्दानगी (आदर्श पुरुष) आणि स्त्रीत्व (आदर्श स्त्री) ची घडण, पितृसत्ता - त्याची वैशिष्ट्ये आणि स्त्रियांवर घातलेली नियंत्रणे, त्यातून तयार झालेल्या समजुती (गैरसमजुती), आणि परिणामी स्त्रियांवर होणारी कौटुंबिक हिंसा याबद्दल वरील भागात चर्चा झाली आहे. या सर्व गोष्टींच्या आधारे आपण जेव्हा हिंसा पीडित स्त्रीला एक सहभागी व्यक्ती / संस्था म्हणून प्रतिसाद देतो तेव्हा तो लिंगभाव संवेदनशील प्रतिसाद ठरतो.

लिंगभाव संवेदनशील प्रतिसाद देण्यासाठी खाली नमूद केलेल्या किमान गोष्टी करणे अत्यावश्यक आहे.

१. पीडित स्त्रीवर कोणकोणत्या प्रकारची हिंसा झाली आहे, हे ओळखणे
२. आपल्याकडे मदतीसाठी आलेल्या पीडित महिलेवर कोणकोणती नियंत्रणे आहेत आणि कोणत्या नियंत्रणास आव्हान दिल्यामुळे हिंसा होत आहे, ते ओळखणे
३. लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून प्रतिसाद देणे, समानुभूती व्यक्त करणे
४. समानतेसाठी ‘सकारात्मक भेदभाव’ ही संकल्पना लक्षात ठेवणे, आत्मसात करणे

६.१ पीडित स्त्रीवर कोणकोणत्या प्रकारची हिंसा झाली आहे, हे ओळखणे.

हिंसेचे प्रकार:

**अ. शारीरिक:** वेगवेगळ्या प्रकारे शरीरावर आघात करणे, केस धरून डोके आपटणे, उपाशी ठेवणे, ती जेवत असताना सतत तिच्याकडे-ताटाकडे पाहणे, शिळे अन्न खायला लावणे, कोंडून ठेवणे, गरोदरपणात पोटावर लाथा मारणे, विष घालणे इत्यादी

**आ. शाब्दिक/भावनिक:** घालून पाडून बोलणे, टोमणे मारणे, माहेरच्यांशी-ओळखीच्यांशी-संपर्क ठेवू न देणे, मोबाईल वापरू न देणे वा त्यावर पहारा ठेवणे, मुलांच्या मनात तिच्याविरुद्ध भरवणे, मुलांना भेटू न देणे, तिच्याशी न बोलणे, शिव्या देणे इत्यादी

**इ. लैंगिक:** इच्छेविरुद्ध संबंध लादणे, गर्भनिरोधक वापरण्यास मनाई करणे वा सक्ती करणे, सक्तीचे गरोदरपण-बाळंतपण, गर्भपात करायला भाग पाडणे, नवऱ्याशिवाय इतरांशी संबंध ठेवण्यास भाग पाडणे, इत्यादी

**ई. आर्थिक:** घराबाहेर जाऊन कमाई करू न देणे, दिलेल्या प्रत्येक पैशाचा हिशेब विचारणे, तिची कमाई काढून घेणे वा ती घरासाठी वापरायची सक्ती करणे, तिने कमावलेल्या पैशातून दुसऱ्याच्या नावावर वस्तू खरेदी करणे, तिचे डेबिट कार्ड नवऱ्यानेच वापरणे, तिचे ऑनलाईन बँकिंगचे सर्व व्यवहार दुसऱ्या कोणीतरी करणे इत्यादी

जेव्हा शारीरिक, आर्थिक किंवा लैंगिक हिंसा होते तेव्हा मानसिक हिंसाही होतच असते किंवा लैंगिक हिंसा होते तेव्हा शारीरिक हिंसा होतच असते, ही गुंतागुंत लक्षात घेतली पाहिजे. हे प्रकार केवळ उदाहरणादाखल दिलेले असून ही यादी आणखी खूप वाढवता येईल.

६.२ आपल्याकडे मदतीसाठी आलेल्या पीडित महिलेवर कोणकोणती नियंत्रणे आहेत, आणि कोणत्या नियंत्रणास आव्हान दिल्यामुळे हिंसा होत आहे - ते ओळखणे

लिंगभावाच्या चौकटीतून पीडित महिलेच्या परिस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी, नियंत्रणे ओळखण्यासाठी पुढील उदाहरणे उपयोगी पडतील.

| | हिंसेचे उदाहरण | हिंसेचा प्रकार | नियंत्रण |
|---|---|---|---|
| १. | मुलीच होतात म्हणून माहेरी पाठवण्याची धमकी देणे | शाब्दिक/भावनिक | पुनरुत्पादन |
| २. | अधिक महिन्यात सोन्याचे लॉकेट दिले नाही म्हणून घालून पाडून बोलणे | शाब्दिक/भावनिक व आर्थिक | मालमत्ता |
| ३. | संशयावरून मारहाण करणे | शारीरिक, मानसिक | लैंगिकता |
| ४. | भाजीत मीठ कमी पडले म्हणून शिव्या घालत ताट फेकून देणे | शाब्दिक/भावनिक | श्रम |
| ५. | घराबाहेर पडून मैत्रिणींना भेटण्यास मज्जाव करणे | भावनिक | संचार |
| ६. | ‘खालच्या’ मानलेल्या जातीतील मुलावर प्रेम करते म्हणून इच्छेविरुद्ध लग्न लावण्याचा प्रयत्न करणे | शाब्दिक/भावनिक | लैंगिकता |
| ७. | स्त्रीच्या कमाईतून घेतलेली कार नवऱ्याच्या नावावर घेणे | आर्थिक | मालमत्ता |
| ८. | जबरदस्तीने गर्भपात करणे | शारीरिक, भावनिक | पुनरुत्पादन |
| ९. | इच्छेविरुद्ध लैंगिक संबंध लादणे | लैंगिक | लैंगिकता |
| १०. | अंधार पडायच्या आत घरी येण्याची सक्ती असणे | भावनिक | संचार |
| ११. | दिवाळीचा सगळा फराळ घरीच बनवला पाहिजे यासाठी दबाव टाकणे | भावनिक | श्रम |
| १२. | विपन्नावस्थेतील वृध्द आईला पैशांची मदत नाकारणे | आर्थिक | मालमत्ता |
| १३. | नोकरी करण्यास मज्जाव करणे | शारीरिक, भावनिक | श्रम |
| १४. | गर्भनिरोधक वापरू न देणे | लैंगिक | पुनरुत्पादन |
| १५. | डेबिट कार्ड नवऱ्याकडेच असणे आणि सर्व व्यवहार त्यानेच करणे | आर्थिक | मालमत्ता |

वरील उदाहरणांमध्ये फक्त तिसऱ्या उदाहरणातच मारहाण आहे. अनेकदा हिंसा म्हटले की मारहाण वा इतर कोणत्या तरी प्रकारची शारीरिक हिंसा डोळ्यासमोर येते. मात्र, हिंसेचे अनेक प्रकार असतात, हे लक्षात घेतले पाहिजे.

## सरावासाठी काही उदाहरणे

**पुढे दिलेली वाक्ये कोणकोणत्या प्रकारची नियंत्रणे दर्शवतात?**

१. 'आपली शेती किती आहे, याच्या उठाठेवी तुला कशाला हव्यात? काल नांदायला आलेली सून तू, याच्यात कशाला लक्ष घालतेस?'
२. 'हिला आता दुसरी मुलगी झाली. हिच्या आईला पण चार मुली! हिला तरी कुठला मुलगा व्हायला?'
३. 'असलं कसलं तुझं काम? बाकीच्या सगळ्या जणी संध्याकाळी सहाच्या आधी घरी येतात, तुलाच कसा उशीर होतो?'
४. 'तुझ्याचकडं बघून तो कसा हसला? तुझं अन् त्याचं काहीतरी असणारंच!
५. 'तुला पुरणपोळ्या करता येत नाहीत? तुझ्या आईने काय शिकवलं मग तुला?'
६. ईदचा शिरखुर्मा बिघडला म्हणून बायकोला शिविगाळ केली. 'मी काय मुद्दाम बिघडवला का?' असा प्रश्न तिने विचारल्यावर नवऱ्याने तिचे डोके भिंतीवर आपटले
७. बायकोच्या बहिणीच्या लग्नात तिच्या माहेरच्यांनी कबूल करूनही जावयाला सूट आणि सोन्याची अंगठी दिली नाही म्हणून बायकोला टोमणे मारणे
८. कॉलेजमध्ये मुलाशी मैत्री केली म्हणून मुलीचे शिक्षण बंद करणे
९. लग्नानंतर वर्ष होऊनही मूल झाले नाही, म्हणून सुनेला दोष देणे
१०. कामावरून घरी यायला उशीर होतो म्हणून सुनेला जाच करणे. तू कोणातरी पुरुषाबरोबर बोलत बसतेस असा नवऱ्याने संशय घेणे. उशीरा घरी आल्यावर सगळे घरकाम तिलाच करायला लावणे

**वरील प्रश्नांची उत्तरे पुढील तक्त्यात दिली आहेत.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मालमत्ता | ६. | श्रम |
| २. | पुनरुत्पादन | ७. | मालमत्ता |
| ३. | संचार | ८. | लैंगिकता |
| ४. | लैंगिकता | ९. | पुनरुत्पादन |
| ५. | श्रम | १०. | संचार, लैंगिकता आणि श्रम |

## ६.३ लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून प्रतिसाद देणे, समानुभूती व्यक्त करणे

सहभागी  व्यक्ती / संस्था म्हणून काम करत असताना आपल्यावर पितृसत्ताक समाजाचा परिणाम होतो कारण आपण या समाजाचाच भाग असतो आणि आपली जडणघडण करण्यात पितृसत्ता आणि इतर विषम संरचना महत्त्वाची भूमिका बजावतात.

उदाः 'बायकोने स्वयंपाक वेळेवर तयार ठेवणे हे तिचे कर्तव्यच आहे आणि न झाल्यास नवऱ्याने मारहाण केली तर गैर काय?', असे न्यायाधीशांना वाटू शकते. पण लिंगभाव संवेदनशीलता असलेले न्यायाधीश, स्वयंपाक वेळेवर न झाल्यास त्यामागे कारणे काय असतील, तिला फक्त स्वयंपाक एवढे एकच काम घरात असते का, स्वयंपाकाची-घरकामाची जबाबदारी फक्त बाईचीच का असते, पुरुष घरकामात फारसा सहभाग का घेत नाहीत, या साऱ्या मुद्द्यांचा विचार करतील. शिवाय 'नवऱ्याने एखादे काम वेळेवर न केल्यास बायको त्याला मारहाण करते का? असे सत्तासंबंधांच्या दृष्टिकोनातून त्याचे विश्लेषणही करतील'

लिंगभावाचा मुद्दा लक्षात न घेतलेला पोलिस कर्मचारी एखाद्या हिंसाग्रस्त महिलेला, 'एक थप्पड मारली तर काय बिघडलं?' असे विचारेल. मात्र, एक थप्पड ही देखील हिंसाच आहे, आणि थप्पड न मारताही, शाब्दिक, मानसिक-भावनिक हिंसा घडू शकते, हे लक्षात घेईल.

'इतकी मुलं जन्माला घालायची काय गरज होती?' असे वाक्य वैद्यकीय अधिकारी पीडित महिलेला ऐकवू शकतात. अशा वैद्यकीय अधिकाऱ्याचे लिंगभावाचे प्रशिक्षण झाले नसणार, हे उघड आहे. मुले किती व्हावीत हे बाईच्या हातात नसते, मुलगा व्हावा यासाठी बाळंतपणे लादली जातात, मुली झाल्यास तिलाच दोष दिला जातो, याची जाणीव अधिकाऱ्यांना असेल.

## ६.३.१ पीडित स्त्रीकडे लिंगभाव संवेदनशील (GENDER SENSITIVE) दृष्टिकोनातून पाहिल्यास नेमका काय फरक होईल, याची उदाहरणे खालील तक्त्यात दिली आहेत?

| **सहभागी व्यक्ती / संस्था** | **लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून न पाहिल्यास** | **लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून पाहिल्यास** | **लिंगभाव संवेदनशील प्रतिसाद** |
|---|---|---|---|
| संरक्षण अधिकारी | ‘काल या बाई नवऱ्याविरुद्ध तक्रार घेऊन आल्या आणि आज म्हणतात ‘तक्रार मागे घ्यायची’, याला काय अर्थ आहे?’ असे वैतागून म्हटले जाऊ शकते. त्यामुळे स्त्रियांच्या तक्रारी गंभीरपणे घेतल्या न जाण्याची शक्यता वाढते. | पितृसत्ताक नियंत्रणांमुळे स्त्रियांवर दबाव येत असतो. नवऱ्याने गोड बोलून, आमिष दाखवून, दबाव टाकून तक्रार मागे घ्यायला लावलेली असू शकते किंवा तक्रार केल्यास नवऱ्यावर कारवाई होईल या भीतीने बाई स्वत:च तक्रार मागे घेऊ इच्छिते. कारवाई झाल्यास नातेवाईक, शेजारी तिलाच दोष देण्याची शक्यता असते, हे संवेदनशीलपणे समजून घेतले जाईल. | ‘काही हरकत नाही. तुम्हाला गरज वाटल्यास परत कधीही येऊ शकता. माझा फोन नंबर तुम्हाला दिला तर चालेल ना?’ असे म्हणून तिला आश्वस्त करावे. यातून तिच्या निर्णयाचा आदर केला जात आहे आणि आपला फोन नंबर देताना तिचा त्रास त्यातून वाढणार नाही ना, याचीही काळजी घेतली जात आहे. |

| सहभागी व्यक्ती / संस्था | लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून न पाहिल्यास | लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून पाहिल्यास | लिंगभाव संवेदनशील प्रतिसाद |
|---|---|---|---|
| पोलिस अधिकारी | 'नवरा म्हटल्यावर मारणारच, त्यासाठी रात्री साडेबाराला पोलिसांना फोन करण्याची काय गरज होती?' यासारखी वाक्ये उच्चारली जातील. त्यामुळे स्त्रियांच्या मनात पोलिसांबद्दल भीती आणि अविश्वास निर्माण होईल. 'नवऱ्याने मारणे योग्यच आहे', असे म्हटल्याने पितृसत्ताक विचारांना व नियंत्रणांना बळकटी मिळेल. शिवाय पोलिसांची स्वत:ची सत्ताही अधोरेखित होईल. त्यामुळे ती स्वत:लाच दोषी मानू लागेल. परिणामी ती पोलिसांकडे येण्यास घाबरेल आणि हिंसा सहन करत राहील. | स्त्रियांवर होणारे अत्याचार हे सत्तासंबंधांची परिणीती आहे आणि कायदा व सुव्यवस्था केवळ घराबाहेर राखणे पुरेसे नसून घराच्या आतही राखली जाणे महत्त्वाचे आहे, याची जाणीव असेल. मारहाण अनेकदा रात्री केली जाते, हे ही लक्षात घेतले जाईल. स्त्रीच्या जीवाला धोका असू शकेल म्हणूनही तिने इतक्या रात्री फोन केलेला असू शकतो. | 'ताई, काळजी करू नका, मी येतोच. तुमचा पत्ता सांगा'. असे वाक्य उच्चारून दुसऱ्या रकान्यातील विधाने नाकारली जातील. |

| **सहभागी व्यक्ती / संस्था** | **लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून न पाहिल्यास** | **लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून पाहिल्यास** | **लिंगभाव संवेदनशील प्रतिसाद** |
|---|---|---|---|
| वैद्यकीय अधिकारी | 'पडल्यामुळे जखम झाली' असे पीडित महिला सांगते आणि वैद्यकीय अधिकारी त्यावर अधिक प्रश्न न विचारता तशीच नोंद केस पेपरवर करतील. त्यामुळे वैद्यकीय व्यवसायाची सामाजिक प्रश्नांप्रति अनास्था असल्याचे दिसून येईल. हिंसापीडित महिलेला मदत केल्यास आपल्याला साक्ष देण्यासाठी न्यायालयात जावे लागेल म्हणून नोंदी करण्यास टाळाटाळ केली जाऊ शकेल. | जखम नेमकी कशामुळे झाली, याबाबत अधिक प्रश्न विचारल्यास ती कौटुंबिक हिंसाचाराची घटना असल्याचे लक्षात येईल. तशी नोंद केल्यास पुढे न्यायालयात या नोंदी उपयोगी पडू शकतील. हिंसापीडित महिला आल्यास जखमेचा घाव किती खोल आहे, किती वाजता महिला मदतीसाठी आली होती, याबाबतच्या नोंदी वैद्यकीय अहवालात केल्यास महिलेला न्याय मिळणे सोपे होईल. | महिलेच्या बरोबर कोणी व्यक्ती असल्यास तिला बाहेर बसण्याची विनंती करून, 'ताई, ही जखम नेमकी कशामुळे झाली? असे विचारले जाईल. 'तुम्हाला नेमकी कशामुळे जखम झाली याची नोंद आत्ता केली नाही तर पुढे करता येणार नाही. गरज पडल्यास या नोंदींचा पुढे उपयोग करता येईल. घरात होणाऱ्या मारहाणी/छळासंदर्भात मदत हवी असल्यास मी मार्गदर्शन करू शकेन' असे म्हटले जाईल. |

| सहभागी व्यक्ती / संस्था | लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून न पाहिल्यास | लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून पाहिल्यास | लिंगभाव संवेदनशील प्रतिसाद |
|---|---|---|---|
| वकील | पीडित स्त्री ने नुकत्याच घडलेल्या हिंसेच्या प्रसंगांबाबत वकिलाला माहिती दिली. त्याच्या नोंदी वकिलाने केल्या. अर्ज तयार केल्यानंतर, काही महिन्यांपूर्वी घडलेला हिंसेचा प्रसंग पीडित स्त्रीला आठवला. तो तिने सांगितल्यावर 'एकदमच सांगता आलं नाही का? आता मला पुन्हा काम करावे लागेल' असे वकिलाने चिडून म्हटले. | पितृसत्ताक समाजातील स्त्रियांवरील बंधने, स्त्रीची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक पार्श्वभूमी, तिच्यात बिंबवलेली सहनशीलता, वकिलाकडे आल्याने वाटणारा अपराधीपणा, यामुळे ती स्त्री दडपणात असू शकते. त्यामुळे असे घडू शकते. स्त्रियांवर विविध नियंत्रणे असतात, त्यांना शिक्षण घेऊ दिले जात नाही. 'सहनशीलता' बिंबवलेली असते, हक्कांची माहिती नसते, वकिलाची फी देण्यासाठी पैसे नसतात आणि पुरुष मात्र असा दुर्बल नसतो, त्याच्या स्थानामुळे तो न्यायही सहज मिळवू, वाकवू, विकत घेऊ शकतो, हे समजून घेतले जाईल. | 'मी तयार केलेल्या अर्जात तुम्ही सांगितलेल्या मुद्याची भर घालायला वेळ लागेल. आणखीन काही महत्त्वाचे सांगायचे राहिले असेल तर तेही सांगा. कदाचित आज अर्ज दाखल होऊ शकणार नाही. पण आपण तो लवकरात लवकर दाखल करू' असा वकिलाचा प्रतिसाद असू शकेल. |

| सहभागी व्यक्ती / संस्था | लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून न पाहिल्यास | लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून पाहिल्यास | लिंगभाव संवेदनशील प्रतिसाद |
|---|---|---|---|
| **न्यायदंडाधिकारी** | 'लग्नानंतरच्या बारा वर्षात नवऱ्याने बायकोवर कधी हात उचलला नव्हता. मग आताच मारहाण सुरू झाली?' न्यायदंडाधिकारी | मारहाण ही सत्तासंबंधातून निर्माण होते. सत्ता संबंध हे कितीही वर्षांनी व्यक्त होऊ शकतात. त्यामुळे लग्नाला किती वर्षे झाली हा मुद्दाच गैरलागू आहे. बाईने नवऱ्याला मारले तर 'पंचवीस वर्षात बाईने मारले नाही आणि आत्ताच कसे मारले, असा प्रश्न न्यायाधीश विचारतील का? | ज्याअर्थी स्त्री शपथपत्रावर माहिती देते आहे, ते पाहता आणि पुरुषप्रधान व्यवस्था लक्षात घेता, हिंसा सहन होईनाशी झाली, म्हणूनच तिने हे पाऊल उचलले आहे, हे लक्षात घेतले जाईल. |

| सहभागी व्यक्ती / संस्था | लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून न पाहिल्यास | लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून पाहिल्यास | लिंगभाव संवेदनशील प्रतिसाद |
|---|---|---|---|
| समुपदेशक | 'नवऱ्याला आवडत नसेल तर तू दुसऱ्या पुरुषाशी कशाला बोलतेस? तू त्याच्याशी बोलणं थांबवलं तर नवरा मारहाण थांबवेल' असा सल्ला बाईला दिला जाऊ शकेल | बायकोने सांगितले तर नवरा दुसऱ्या बाईशी बोलणे थांबवेल का? नवरा बायकोवर संशय घेतो याची कारणे पितृसत्ताक व्यवस्थेत आहेत, हे लक्षात घेऊन सल्ला दिला जाईल. | 'बाईने कोणाशी बोलायचे याचा निर्णय घेण्याचा अधिकार तिला आहे. त्यामुळे, याबाबत आपल्याला तुमच्या नवऱ्याला समजावून सांगावे लागेल' अशी वाक्ये उच्चारून तिला दिलासा दिला जाईल. |

### ६.३.२ काही वेळा पीडित स्त्री शेवटच्या क्षणी केस मागे घेते. असे का?

स्त्रीने हिंसा सहन करत राहिले पाहिजे, पुरुष कसाही वागला तरी तिनेच सगळा संसार तारून नेला पाहिजे, अशी समजूत असते. त्यामुळे ती शक्यतो हिंसेविरोधात दाद मागतच नाही. आज ना उद्या परिस्थिती ठीक होईल असे तिला वाटत असते. समजा ती सामाजिक संस्था, पोलिस, न्यायालय यांची मदत घेत असेल तरी तिच्या मनात अपराधी भावना असते. 'आपल्यामुळे संसार मोडतोय' असे तिला वाटत असते आणि इतर लोकही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या तसेच सुचवत असतात. पीडित स्त्री पोलिस स्टेशनमध्ये गेली तरी पोलिसांनी नवऱ्याला समजावून सांगावे मात्र त्याच्याविरूद्ध कायदेशीर कारवाई करू नये, असे तिला वाटत असते. आपला संसार सुरळीत व्हावा, अशीच भावना तिच्या मनात असते. स्त्री कुठे दाद मागायला गेली तर नवरा आणि सासरचे लोक चिडलेले असतात. छळाला कंटाळून माहेरी गेली तरी तिथे माहेरचे लोक आणि शेजारी तिला 'तिने पुन्हा सासरी नांदायला जावे', असे सुचवत असतात. विवाहित स्त्री माहेरी खूप काळ राहत असेल आणि नांदायला जात नसेल तर माहेर आणि सासरच्या कुटुंबांची 'इज्जत' जाते असे मानले जाते. ती माहेरी आली तर माहेरच्या 'नांदत्या' स्त्रियांच्या (तिची वहिनी, आई इ.) तुलनेत या स्त्रीचे स्थान खालचे असते. माहेरच्या घरीही तिला खूप राबावे लागते.

काही वेळा नवरा आणि सासरचे लोक नमतेही घेतात. अशा परिस्थितीत केस पुढे चालू राहिली तर कदाचित संसार तुटेल अशी भीती तिला असते. काही वेळा मधे बराच काळ निघून जातो आणि दरम्यान नवऱ्याबरोबर तिचे संबंध ताणलेले असले तरी बरेचसे सुरळीतही झालेले असू शकतात. मुले असतील तर त्यांचे काय, त्यांच्यावर होणारा परिणाम अशा अनेक कारणांमुळे स्त्रिया शेवटच्या क्षणीदेखील केस मागे घेतात.

### ६.४ समानतेसाठी 'सकारात्मक भेदभाव' ही संकल्पना लक्षात ठेवणे, आत्मसात करणे

**सकारात्मक भेदभाव**

स्त्रियांना एवढीच जर समानतेची हौस आहे, तर त्यांना राजकारणात वा बसमध्ये राखीव जागा हव्यातच कशाला? हा हमखास विचारला जाणारा प्रश्न आहे. स्त्रियांच्या वा इतर वंचित गटांच्या (उदाः दलित, विकलांग) वेगळ्या परिस्थितीचा व गरजांचा विचार करून त्यांना सोयी, सवलती, सुविधा देणे, त्यांच्यासाठी विशेष कायदे बनवणे, ही राज्याची जबाबदारी आहे. आपल्या राज्य

घटनेतील ‘सामाजिक न्याया’च्या संकल्पनेमागील विचार हाच आहे. अशा आरक्षण वा सोयींना ‘सकारात्मक भेदभाव’ म्हटले जाते.

पितृसत्ताक व्यवस्था असल्याने स्त्रियांचे स्थान दुय्यम आहे आणि स्त्रियांवरील हिंसाचाराची मुळे या संरचनेमध्ये आहेत, याची चर्चा आपण याआधी केलेलीच आहे. हिंसाचार हा स्त्रियांच्या (वा कोणाही व्यक्तीच्या) मानवी हक्कांचे, घटनात्मक हक्कांचे उल्लंघन आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ नुसार प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा हक्क आहे तसेच कलम १५ (३) नुसार, स्त्रिया व बालके यांच्यासाठी राज्यसंस्था विशेष तरतूद करू शकते. ‘स्त्रियांविरुद्‌ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या भेदभावांचे निर्मूलन करार’ (CEDAW) हा आंतरराष्ट्रीय पातळीवरील करारनामा भारताने १९९३ साली स्वीकारला असून, त्यानुसार स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेविरोधात पावले उचलणे हे राज्यसंस्थेचे उत्तरदायित्व आहे. या सगळ्या तरतुदींनुसारच स्त्रियांच्या हक्कांसाठी विशेष कायदे केले गेले आहेत. उदाः ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५’ हा त्यापैकीच एक महत्त्वाचा कायदा आहे. २०१३ साली ‘कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा केला गेला.

**स्त्रियांच्या हक्कांसाठी असे कायदे असणे हा पुरुषांविरुद्‌ध भेदभाव नाही.**

खरे तर, पुरुष जन्मत: हिंसक नसतात, ते बदलू शकतात याची चर्चा याआधी आपण केली आहे. पुरुषांना आपले हिंसक वर्तन बदलण्याची संधीच सदर कायदा देतो. या कायद्‌यानुसार हिंसक पुरुषाने हिंसा थांबवावी आणि पीडित स्त्रीच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, या उद्‌देशातून न्यायालय विविध आदेश देते. त्या आदेशांचा भंग केला तर मात्र पुरुषाला शिक्षेची तरतूद आहे. या सगळ्या प्रक्रियेतून हिंसा थांबावी आणि कुटुंबात सुखशांती नांदावी, हाच उद्‌देश आहे. आपलाही तोच उद्‌देश असला पाहिजे. मात्र, पीडित स्त्रीची न्यायालयात जाण्याची इच्छा नसेल तर तिच्या इच्छेचा आदर केला पाहिजे. अर्थात, कोणत्याही परिस्थितीत कुटुंब तुटता कामा नये, अशी आपली भूमिका असून चालणार नाही. वस्तुत: स्त्रिया जाळल्या वा विहिरीत ढकलल्या जातात, तेव्हाही कुटुंब तुटतेच. पण पुरुषाला सहजपणे दुसरे लग्न करता येत असल्याने, ‘कुटुंब’ अबाधित राहते. स्त्रियांना सती जाण्यास भाग पाडले जात होते तेव्हा किंवा आताही हुंडाबळी जातात, तेव्हा ‘कुटुंब वाचवा’ अशा घोषणा दिल्या जायला हव्या होत्या. पण आता स्त्रिया समानतेची आकांक्षा धरू लागल्या आहेत, तेव्हाच ‘कुटुंब व्यवस्था धोक्यात आल्याच्या’ अफवा का पसरवल्या

जातात, यामागची पुरुषप्रधान मानसिकता ओळखणे आवश्यक आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेत, स्त्रियांनी कायम त्यागी असणं, स्वत:ला दुय्यम लेखणं अपेक्षित असतं, मात्र स्त्रिया निसर्गत:च त्यागी नसतात. लोभ, मोह या मानवी भावना त्यांनाही असतात, हे लक्षात घेतले पाहिजे.

**क्रौर्याची सापेक्षता**

पुरुष स्त्रियांशी क्रूरपणे वागतात तशाच स्त्रियाही पुरुषांशी क्रूरपणे वागतात, असा काही लोकांचा आरोप असतो. पुढील तक्त्यात क्रूरपणाची काही उदाहरणे दिली आहेत. कशाला क्रौर्य म्हणायचे हे कसे सापेक्ष आहे, हे त्यातून लक्षात येईल.

| स्त्रियांच्या कोणत्या वर्तनाला क्रौर्य म्हणतात? | स्त्रियांबाबतच्या कोणत्या वर्तनाला क्रौर्य म्हटले जाते? |
| --- | --- |
| ○ नवऱ्याला वेळेवर जेवायला न वाढणे<br>○ नवऱ्याशी अबोला धरणे<br>○ नवऱ्याच्या आई-वडिलांशी अबोला धरणे<br>○ बाईने भांड्यांची आदळआपट करणे<br>○ स्त्रीने दिवाळीसाठी आठवडाभर माहेरी जाणे<br>○ नवऱ्याने मटण करायला सांगूनही ते न करणे<br>○ स्त्रीने उपास-तापास करायला नकार देणे<br>○ नवरा घरी येण्याच्या आधी बायकोने घरी न येणे<br>○ बायकोने स्वत:चे डेबिट कार्ड स्वत:कडेच ठेवण्याचा आग्रह धरणे<br>○ एकत्र कुटुंबात खूप काम पडते म्हणून बायकोने नवऱ्याकडे वेगळे राहण्याचा आग्रह धरणे | ○ बाईच्या अंगावर उकळते तेल ओतणे<br>○ बाईला उपाशी ठेवणे<br>○ बायकोला लाथाबुक्क्यांनी मारहाण करणे<br>○ बायकोला घरखर्चासाठी पैसे न देणे<br>○ बायकोला तिच्या माहेरच्यांपासून तोडून सासरी नांदायला आणणे<br>○ बायकोला नोकरी करण्यास मनाई करणे, चारित्र्याच्या संशयावरून बायकोचा गळा चिरणे,<br>○ मुलीच होतात म्हणून बायकोला माहेरी पाठवण्याची धमकी देणे<br>○ संशयावरून बायकोचा मोबाईल तपासणे<br>○ माहेराहून पैसे आणावेत यासाठी बायकोचा छळ करणे<br>○ बायकोचे डेबिट कार्ड नवऱ्याने वापरणे<br>○ माहेरी जायचे असल्यास सकाळी जाऊन रात्री परत येण्याचे बंधन घालणे |

## ७.० ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५’ लिंगभाव-संवेदनशील हितकारक कायदा

सदर कायद्यामधील तरतुदी करताना लिंगभाव-पुरुषप्रधानता-पितृसत्तेचा विचार कसा केला गेला आहे, हे पुढील तक्त्यात दिले आहे. हे मुद्दे वानगीदाखल असून कायद्यातील इतर अनेक तरतुदी पितृसत्तेच्या विरोधात आहेत, हे शोधता येईल.

| **कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ - महत्त्वाच्या तरतुदी** | | |
|---|---|---|
| मुद्दा/कलम | तपशील | पितृसत्तेतील मुळे |
| कायदा | ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ साली तयार करण्यात आला. कायद्याच्या लाभार्थी फक्त महिला असल्याने कलमांचा अर्थ लावताना लाभार्थीच्या दृष्टिकोनातून लावला गेला पाहिजे. | पितृसत्तेत स्त्रियांकडे घरकामाचे, मूलबाळ जन्माला घालण्याचे आणि पुरुषाच्या लैंगिक सुखाचे साधन म्हणून पाहिले जाऊन तिच्यावर विविध प्रकारची हिंसा केली जाते. हिंसेपासून मुक्त जीवन जगण्याचा हक्क स्त्रियांना आहे, हे मान्य करून यासारखे कायदे केले गेले आहेत. |
| कायद्याचे शीर्षक | ‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे...’ | स्त्रियांवर होणारा हिंसाचार ही एक सुटी घटना नसून त्याला संरचनात्मक आधार आहे. त्यामुळे महिलांचे हिंसेपासून संरक्षण झाले पाहिजे, यासाठी हा कायदा आहे. |
| कलम ३ | कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या | स्त्रियांवर शारीरिक, लैंगिक, शाब्दिक किंवा भावनिक आणि आर्थिक अशा सर्व प्रकारची हिंसा होते. या हिंसेमागे सत्तासंबंध आणि नियंत्रणे असतात. ज्यांच्याकडे जास्त सत्ता असते ते त्यांच्यापेक्षा कमी सत्ता असलेल्यांवर हिंसा करतात. उदाः नवरा बायकोवर, सासू सुनेवर इ. |

| कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ - महत्त्वाच्या तरतुदी | | |
|---|---|---|
| मुद्दा/कलम | तपशील | पितृसत्तेतील मुळे |
| कलम ५ | पीडित महिलेला तिच्या हक्कांची माहिती देणे हे पोलिस अधिकारी, संरक्षण अधिकारी, सेवादायी संस्था, न्यायदंडाधिकारी यांचे कर्तव्य आहे. | स्त्रियांवर असलेल्या नियंत्रणांमुळे त्यांना शिक्षण घेऊ दिले जात नाही. त्या शिकलेल्या असल्या तरी त्यांच्यावर नियंत्रणे असतातच आणि शिक्षणाचा उपयोग संसार अधिक चांगला होण्यासाठी व्हावा अशी स्त्रियांची आणि इतरांचीही अपेक्षा असते. ‘सहनशीलता’ बिंबवलेली असते, हक्कांची माहिती नसते, वकिलाची फी देण्यासाठी पैसे नसतात, इत्यादी |
| कलम १७ | पीडित स्त्रीला घरात राहण्याचा हक्क | स्त्रीच्या नावावर घर नसले तरी तिला राहत्या घरातून बाहेर काढता येणार नाही. |
| कलम १९ | निवासाचा आदेश | घर पुरुषाच्या नावावर असल्याने तो स्त्रीला घराबाहेर काढू शकतो. लग्न करून स्त्री नवऱ्याच्या घरी नांदायला येते, त्यामुळे ते घर माझे आहे, असे नवऱ्याला वाटत असते. हे होऊ नये यासाठी निवासाच्या आदेशाची मागणी करता येते. |
| कलम २० | आर्थिक मदतीचा आदेश | पुरुष ‘कमावता’ आणि स्त्री ही ‘अवलंबून’ असल्याने हिंसाचारामुळे झालेल्या नुकसानासाठी आर्थिक मदतीचा आदेश मिळू शकतो. स्त्री कमावती असली तरी तिच्या उत्पन्नाचा बहुतांश भाग कुटुंबासाठीच वापरात आणला जातो. |

**या कायद्याची काही वैशिष्ट्ये आहेत :**

१. या कायद्याअंतर्गत पोलिस अधिकारी, संरक्षण अधिकारी, सेवादायी संस्था किंवा न्यायदंडाधिकारी यांच्यावर पीडित स्त्रीला या कायद्याखालील तिच्या हक्कांबाबत आणि उपलब्ध असलेल्या सेवांबाबत माहिती देणे बंधनकारक आहे. (कलम ५)

२. कायदा, गृह, आरोग्य, मानव संसाधन अशा सर्व मंत्रालयांनी या कायद्याच्या अंमलबजावणीची एकत्रित जबाबदारी घ्यावी (कलम ११).

३. अर्ज निकाली काढण्यासाठी न्यायालय स्वत:ची प्रक्रिया तयार करेल. (कलम २८)

### कौटुंबिक हिंसाचाराचा बालकांवर होणारा परिणाम[9]

- हिंसक घरात वाढणारी बालके हिंसेची शिकार होण्याची शक्यता जास्त असते.
- अशा बालकांना अभ्यासात अडचणी येऊ शकतात.
- त्यांच्याकडून हिंसक आणि धोकादायक वर्तन घडण्याची अधिक शक्यता असते किंवा ती नैराश्य वा तीव्र चिंताग्रस्ततेची शिकार होऊ शकतात!
- जी बालके कुटुंबात हिंसाचार अनुभवतात, ती मोठी झाल्यावरही हिंसेपासून पीडित होण्याची किंवा हिंसक वर्तन करण्याची शक्यता असते, हे संशोधनातून सिद्ध झाले आहे.
- घरामध्ये सुरक्षित आणि स्थिर वातावरण मिळण्याचा बालकांचा हक्क नाकारला जातो.
- उत्तर अमेरिकेतील एका अभ्यासात आढळले की, कुटुंबात हिंसा असणाऱ्या बालकांवर शारीरिक आणि/किंवा लैंगिक हिंसा होण्याची शक्यता राष्ट्रीय सरासरीच्या पंधरा पट अधिक होती! हा सहसंबंध असाच असल्याचे जगभरातील इतर देशांमध्ये झालेल्या अभ्यासांतून दिसून आले, ज्यात भारताचाही समावेश होता.
- हिंसाग्रस्त कुटुंबातील अर्भके आणि लहान बालकांवर इतका भावनिक तणाव असतो की त्याचा त्यांच्या मेंदूच्या विकासावर तसेच बौद्धिक वाढीवरही विपरीत परिणाम होऊ शकतो

[9] Behind Closed Doors (The Impact of Domestic Violence on Children) या 'युनिसेफ' प्रकाशित माहितीपत्रकातून]

## या कायद्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी मन:पूर्वक सदिच्छा.

या लेखनासाठी अनके शिबिरांमधून, तसेच प्रत्यक्षात व दूरध्वनीद्वारे अनेक ज्ञात व अज्ञात व्यक्तींशी झालेल्या चर्चा उपयोगी पडल्या. इंटरनेटवरूनही काही संदर्भ घेतले आहेत. लेखनासाठी पुढील पुस्तकांचा/साहित्याचा संदर्भ घेतला होता. ही पुस्तके अधिक वाचनासाठी उपयुक्त ठरू शकतील:


१. पुरुषप्रधानतेचे गौडबंगाल, कमला भसीन, अनुवाद: मीना देवल, जया वेलणकर, अक्षरा प्रकाशन, मुंबई

२. चक्रभेद, मनीषा गुप्ते, अर्चना मोरे, मासूम प्रकाशन, पुणे

३. जेंडर क्या है? कमला भसीन,

४. मानवी हक्क प्रशिक्षण मार्गदर्शिका, मासूम प्रकाशन, पुणे

५. आपले विचारविश्व, के.रं.शिरवाडकर, राजहंस प्रकाशन, पुणे

६. प्रवास सक्षमतेकडे - या पुस्तकातील प्रकरण १ ‘कौटुंबिक हिंसा आणि हिंसेची प्रक्रिया व राजकारण’, स्त्री अभ्यास केंद्र, आय्एल्एस् विधि महाविद्यालय, पुणे

७. UGC India E PG Pathshala, Sociology of India module